**सुविचार**

अगर आप अपने प्रश्नों के हल ढूँढ रहे हैं तो आश्चर्यजनक उत्तरों के लिए तैयार रहिए।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शुक्रवार दि. ३० ऑगस्ट २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१८८ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


# डोनाल्ड ट्रम्पची कमला हॅरिसच्या संदर्भात आक्षेपार्ह वक्तव्य

वॉशिंग्टन : अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रुथ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर उपराष्ट्रपती कमला हॅरिस यांच्याबद्दल आक्षेपार्ह पोस्ट शेअर केली आहे. पोस्टमध्ये म्हटले आहे की हॅरिस यांनी राजकारणातील कारकीर्द पुढे नेण्यासाठी शारीरिक संबंधांचा वापर केला आहे. १९९० च्या दशकात, कमला हॅरिस ३० वर्षांनी ज्येष्ठ असलेल्या सॅन फ्रान्सिस्कोचे माजी महापौर विली ब्राउन यांच्याशी नातेसंबंधात होत्या. ते कॅलिफोर्निया राज्य विधानसभेचे अध्यक्षही होते. विली ब्राउन यांच्यासोबतच्या संबंधांमुळे



हॅरिस यांना राजकारणात पुढे जाण्यास मदत झाल्याचा आरोप ट्रम्प यांनी पोस्टद्वारे केला आहे.

ट्रम्प यांनी त्यांच्या एका समर्थकाची पोस्ट पुन्हा शेअर केली. त्यात हॅरिस आणि हिलरी क्लिंटन एकत्र दिसत असलेल्या फोटोचाही समावेश आहे. याद्वारे ट्रम्प यांनी हिलरी क्लिंटन यांच्यावरही भाष्य केले. हिलरी यांचे पती आणि अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांच्यावर १९९५ मध्ये व्हाईट हाऊसमधील इंटर्न मोनिका लेविन्स्कीसोबत शारीरिक संबंध असल्याचा आरोप करण्यात आला होता.

दोघांचे नाते १८ महिने टिकले. २६ जानेवारी १९९८ रोजी एका दूरचित्रवाणी संबोधनात क्लिंटन म्हणाल्या की, त्यांचे लेविन्स्कीसोबत कोणतेही अफेअर नाही. या वादामुळे क्लिंटन यांच्याविरोधात हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्ये महाभियोग प्रस्तावही आणण्यात आला होता. २००० च्या अध्यक्षीय निवडणुकीत या वादाचा फटका डेमोक्रॅटिक पक्षाला सहन करावा लागला होता. गेल्या १० दिवसांत ट्रम्प यांनी कमला हॅरिसवर आक्षेपार्ह टिप्पणी करण्याची ही दुसरी वेळ आहे. याआधी १८ ऑगस्ट रोजी ट्रम्प यांनी हॅरिस आणि विली ब्राउन यांच्या नात्याबाबत एक पोस्ट केली होती.

मला हॅरिस भारतीय आहेत की कृष्णवर्णीय?

यापूर्वी ट्रम्प यांनी कमला हॅरिस यांच्या वांशिक अस्मितेवरही प्रश्न उपस्थित केले होते. ट्रम्प यांनी एका मुलाखतीत विचारले होते की कमला हॅरिस भारतीय आहेत की कृष्णवर्णीय? अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष म्हणाले होते की, कमला हॅरिस नेहमीच स्वत:ला भारतीय वारसा म्हणून **(पान ७ वर)**



# मोदींचे ४०० पारचे स्वप्न अल्पसंख्याकांनी मिळविले धुळीस : शरद पवार

मुंबई : प्रतिनिधी- ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. देशातील अल्पसंख्याकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ४०० पारपासून दूर ठेवले. एक हाती सत्ता हाच ४०० पारचा एकच उद्देश होता. पण देशातील अल्पसंख्याकांनी असे होऊ दिले नाही. अशी टीका पवार यांनी केली.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या अल्पसंख्याक विभागाने राष्ट्रीय कार्यकारणी बैठक आणि कार्यकर्ता संमेलन मुंबईत झाले. या कार्यक्रमात त्यांनी मुस्लिमांना आरक्षण देण्याची मागणी केली. विधानसभा निवडणुकीत सत्ताधा-यांना सत्तेतून खेचण्यासाठी त्यांनी कार्यकर्त्यांना एक मंत्र दिला.

वक्फ बोर्डानुसार, अल्पसंख्यांकांना जे अधिकार देण्यात आले आहेत, ते संपवण्याचे षडयंत्र करण्यात येत आहे. वक्फ मालमत्तेचे काय करायचे, त्याचा कोणत्या कामासाठी वापर करायचा, हा अधिकार अल्पसंख्याकांचा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हातातून सत्ता खेचण्यासाठी २ जागा कमी मिळाल्या तरी हरकत नाही, पण आम्ही जादा जागा मागणार नाहीत. गेल्या १० वर्षांपासून देशाची सत्ता चुकीच्या हातात आहे. सर्व जातीधर्माच्या लोकांचा विश्वास संपादन करणे हे सत्ताधा-यांचे कर्तव्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हा देश सर्वांचाच आहे. ज्यांच्यावर असे वातावरण तयार करण्याची जबाबदारी आहे, ते त्याकडे दुर्लक्ष करत आहेत. लोकसभा निवडणुकीत देशातील पंतप्रधान ४०० पारचा नारा देत होते. कशाला हव्या होत्या त्यांना इतक्या जागा? ४०० पारचा नारा हा देशाच्या हितासाठी नव्हता. तर एका व्यक्तीच्या हातात अधिकार यावेत यासाठी होता. याविषयीची भीती वेळीच ओळखल्यानंतर ४०० पार ना-याचे स्वप्न भंगले. देशातील जनता सामाजिक ऐक्य बंधुता हवी आहे. शांतता हवी आहे. ४०० पारचा आकडा ओलांडल्यानंतर यात अडथळा निर्माण होऊ शकला असता.

सरकारला भ्रष्टाचाराची लागण

नवीन संसदेच्या इमारतीच्या उद्धघाटनावेळी अशा लोकांन बोलवण्यात आले, ज्याचे या प्रक्रियेशी काहीही देणे घेणे नव्हते. त्यावेळी संसदेच्या सदस्यांना बोलवण्यात आले नाही. नवीन **(पान ७ वर)**

# ओळख प्रमाणपत्र पॅन कार्डसाठी वैध ट्रान्सजेंडर पर्याय उपलब्ध

नवी दिल्ली : भारतातील सर्वोच्च न्यायालयाला केंद्र सरकारने कळवले आहे की ट्रान्सजेंडर पर्सन्स (प्रोटेक्शन ऑफ राइट्स)अ‍ॅक्ट, २०१९ अंतर्गत जारी केलेले सर्टिफिकेट ऑफ आयडेंटिटी हे पॅन कार्ड मिळविण्यासाठी वैध कागदपत्र म्हणून मान्यता प्राप्त होईल.



हा निर्णय पॅन कार्डवर तिसरे लिंग पर्याय समाविष्ट करण्याची विनंती करणा-या याचिकेच्या प्रतिसादात आला आहे, जो आधार प्रणालीशी जुळता मिळता होता.

केंद्राने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले आहे की ट्रान्सजेंडर पर्सन्स (प्रोटेक्शन ऑफ राइट्स) अ‍ॅक्ट, २०१९ अंतर्गत जिल्हाधिकारीद्वारे जारी केलेले सर्टिफिकेट ऑफ आयडेंटिटी हे पॅन कार्डसाठी अर्ज करण्यासाठी वैध कागदपत्र म्हणून मान्यता प्राप्त होईल. न्यायमूर्ती सुधांशु धूलिया आणि अहसनुद्दीन अमानुल्ला यांचे बेंच म्हणाले की भारत सरकारने या विनंतीला तत्त्वत: मान्यता दिली आहे आणि केंद्र सरकार नियम देखील समाविष्ट करण्याचा विचार करू शकते जेणेकरून स्पष्टता आणता येईल.

या याचिकेच्या प्रलंबित काळात, आम्ही भारत सरकारकडून उत्तर मागितले, जे या बाबतीत खूप सहाय्यक राहिले आहे आणि **(पान ७ वर)**

# बलूच आर्मी आक्रमक; चीनी लोकांना पाक सोडण्याचे फर्मान



इस्लामाबाद : - बलूच लिबरेशन आर्मीने गेल्या दोन दिवसांपासून पाकिस्तानात जबरदस्त धुमाकुळ घातला आहे. यामुळे पाकिस्तानी सैन्याचेही हाल बेहाल झाले आहेत. आता बलूच लिबरेशन आर्मीने पाकिस्तानात राहणा-या चिनी नागरिकांना पाकिस्तान सोडण्याचे फरमान सोडले आहे. जर आपल्या भागात कुणी चिनी नागरिक आढळला, तर ठार केला जाईल, अशी धमकीही बीएलएने दिली आहे.

चिनी नागरिकांना निशाना बनवण्यासाठी बलूच आर्मीने एक स्पेशल युनिट तयार केली आहे. बलूच आर्मीच्या एका फिदायीन गटाने नुकताच पाकिस्तानात प्रचंड विध्वंस करत ७० हून अधिक लोक मारले आहेत. यात पाकिस्तानी सैन्य आणि पोलिसातील १४ जवानांचा समावेश आहे.

खरे तर, चीन पाकिस्तानमध्ये सीपीईसी कॉरिडॉर तयार करत आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी चीन पाण्यासारखा पैसा खर्च करत आहे. पाकिस्तानातील आपला हा प्रकल्प पूर्ण होईल, अशी चीनला आशा आहे, मात्र बलूच लिबरेशन आर्मीने पाकिस्तानी लष्कराविरोधात ज्या प्रकारे आघाडी उघडली आहे, त्यावरून चीनचा प्रकल्प पुन्हा एकदा अडकणार असल्याचे दिसत आहे. **(पान ७ वर)**

# प. बंगालची घटना अत्यंत वेदनादायी

नवी दिल्ली : वृत्तसंस्था- कोलकाता येथील घटना वेदनादायक आणि भयावह आहे. बस्स. आता खूप झाले. ज्यावेळी कोलकाता येथे विद्यार्थी, डॉक्टर आणि नागरिक आंदोलन करत होते, तेव्हा या प्रकरणातील आरोपी खुलेआम फिरत होते, असे स्पष्ट करीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या घटनेबद्दल तीव्र संताप व्यक्त केला.

देशात महिलांवर होणा-या अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वी कोलकाता येथील डॉक्टर तरुणीवर बलात्कार करत तिची हत्या करण्यात आली होती. तसेच बदलापूर येथे दोन चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचाराचे प्रकरण पुढे आले होते. याशिवाय इतरही राज्यातून अशाच प्रकारच्या घटना पुढे आल्या आहेत. या घटनांनंतर नागरिकांनी रस्त्यावर उतरून आंदोलन सुरू केले आहे. यावरून देशभरात संतापाची लाट उसळली आहे. यावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही नाराजी व्यक्त केली.

कोणताही सुसंस्कृत समाज मुलींवर अशाप्रकारे अत्याचार होऊ देऊ शकत नाही. समाजाला आता प्रामाणिकपणे आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. समाजाची दयनीय मानसिकता महिलांना कमी लेखते. १२ वर्षांपूर्वी झालेल्या निर्भया प्रकरणानंतर अशा ब-याच घटना घडल्या आहेत. मात्र, समाजाने याकडे दुर्लक्ष केले. आपल्या समाजाला सामूहिक स्मृतिभ्रंशाचा त्रास झाल्याचे दिसून येते, या संकटाचा आपण सर्वांनी मिळून सामना केला पाहिजे, असेही राष्ट्रपती म्हणाल्या.

# चंद्रकांत पाटलांनी स्विकारला कुख्यात गुंड गजा मारणेकडून सत्कार

पुणे : गेल्या काही वर्षांमध्ये महाराष्ट्रातील अनेक नेत्याचे गुंडांसोबत फोटो पाहायला मिळाले आहेत. शिवाय अनेक राजकारणी मंडळींनी कुख्यात गुंडांकडून सत्कारही स्वीकारले आहेत. काही महिन्यांपूर्वी अहमदनगरचे खासदार निलेश लंके यांनी कुख्यात गुंड गजा मारणे यांच्याकडून सत्कार स्वीकारला होता. त्यानंतर लंकेंवर टीका झाल्यानंतर गजा मारणेची पार्श्वभूमी माहिती नसल्याचे सांगत सारवासारव करण्याचा प्रयत्न केला होता. दरम्यान आता भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील यांनीही गजा मारणेकडून सत्कार स्वीकारला आहे. त्यामुळे चंद्रकांत पाटलांवरही विरोधकांकडून टीका केली जाण्याची शक्यता आहे.

कुख्यात गुंड गजानन मारणे याने मंगळवारी झालेल्या दही हंडी कार्यक्रमात मंत्री चंद्रकांत पाटील यांचं पुष्पगुच्छ देऊन स्वागत केलं. गजानन मारणे हा पुण्यातील कोथरूड भागात वास्तव्यास असून चंद्रकांत पाटील कोथरूडचे आमदार आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीत पुन्हा कोथरूडमधून निवडणूक लढविण्यासाठी त्यांची तयारी सुरू आहे. त्यामुळेच त्यांनी गजा मारण्याकडून सत्कार स्वीकारल्याची चर्चा आहे. दरम्यान, आता चंद्रकांत पाटील याबाबत काय स्पष्टीकरण देतात याकडे सर्वांचे लक्ष आहे.

अमोल बधे आणि पप्पू गावडे खून प्रकरणात कुख्यात गुंड गजा मारणेला अटक करण्यात आली होती. तो ३ वर्ष येरवडा कारागृहात शिक्षा भोगत होता.तो आता मारणे टोळीचा म्होरक्या असल्याचे बोलले जाते. या टोळीवर २३ हून अधिक गुन्हे दाखल आहेत. गजा मारणेवर सहापेक्षा अधिक खुनाचे गुन्हे दाखल आहेत. मागील वर्षी पुण्यातील **(पान ७ वर)**



# लातूरचे खासदार डॉ शिवाजी काळगे यांची शिव कथेला उपस्थिती महास्वामीजींचे घेतले आशीर्वाद

लातूर / प्रतिनिधी- येथील विशाल नगर भागातील श्री काशी विश्वेश्वर मंदिर या ठिकाणी ष ब्र १०८ अमृतेश्वर शिवाचार्य महाराज यांची शिव कथा सुरू आहे लातूरचे खासदार डॉ शिवाजी काळगे यांनी श्री काशी विश्वेश्वर मंदिर येथे शिवकथेचे श्रवण केले ,ष ब्र १०८ शांतवीरलिंग शिवाचार्य महाराज व ष ब्र १०८ अमृतेश्र्वर शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते देवस्थान समितीच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी समन्वयक प्रा मन्मथ पंचाक्षरी, बसवंतप्पा भरडे, सुभाषप्पा मुक्ता, जगन्नाथ कोळंबे,सुरेश दोशट्टी,एड उमाशंकर पाटील ,ओंकार पंचाक्षरी , राम स्वामी ,शिवकांत स्वामी यांच्यासह देवस्थान समितीचे पदाधिकारी व भाविक बंधु भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मालवण घटनेच्या निषेधार्थ अजित पवार गटाचे आंदोलन

नागपूर : मालवणमध्ये तीन दिवसांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना घडली. त्या निषेधात राज्यभरातून संताप व्यक्त जात असून, शिवभक्ताकडून राज्य सरकारच्या भ्रष्टाचाराचे कोथळे बाहेर काढले जात आहेत. अशातच आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार गटाकडून नागपूरसह राज्यभर मालवणमधील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बनविणा-या कॉन्ट्रॅक्टरवर कठोर कारवाई करण्याची मागणी करत मूक आंदोलन करण्यात येत आहे. नागपूरात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हे आंदोलन सुरू आहे. तर या आंदोलनावर ताशेरे ओडत खासदार संजय राऊ त यांनी अजित पवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

अजित पवार गटाकडून आयोजित केलेल्या आंदोलनात मोठी गर्दी पहावयास मिळाली. यावेळी आंदोलकांनी शिवाजी महाराज की जय अशा घोषणा दिल्या त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन निवेदन देण्यात आले. दरम्यान, सत्तेत असून, सरकारविरोधात आंदोलन करणा-या अजित पवार गटामुळे आगामी निवडणुकीच्या तोंडावर महायुतीमध्ये खटके उडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दोषींवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी राज्यभर मूक आंदोलनाची हाक दिली आहे. अवघ्या आठ महिन्यांत महाराजांचा पुतळा कोसळला, ही धक्कादायक बाब आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी म्हटले आहे.

अजितदादा आंदोलन काय करता, राजीनामा द्या: संजय राऊत

दरम्यान, शिवरायांचा पुतळा उभारण्यात मोठा भ्रष्टाचार झाला आहे. कुणी किती पैसे **(पान ७ वर)**

# बाभळगाव येथे बस थांबा कामाचा शुभारंभ



लातूर प्रतिनिधी - स्थानिक आमदार विकास निधीतून लातुर शहर विधानसभा मतदारसंघात उभारण्यात येणाऱ्या प्रवाशी बस थांबा शेल्ड कामाचा शुभारंभ आज गुरुवार दि. २९ ऑगस्ट रोजी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये बाभळगाव येथील दयानंद माध्यमिक विद्यालय समोर बाभळगाव लातुरकडे येणाऱ्या आणि लातुरकडून बाभळगावकडे जाणाऱ्या अशा दोन्ही बाजूने प्रत्येकी एक असे दोन बस थांबे उभारण्यात येणार आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जे.के. असोसिएट्सकडून लातुर शहर विधानसभा मतदारसंघात २६ प्रवाशी बस थांबे (शेल्ड) उभारण्यात येणार असून यासाठी स्थानिक आमदार निधीतून १ कोटी २६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक बस थांब्यासाठी ७ लाख रुपयांची तरतूद आहे. यात महिला व पुरुष आणि विद्यार्थी यांच्याकरिता स्वतंत्र बेंच ची बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे.

यावेळी बाजार समिती सभापती जगदिश बावणे, उपसरपंच गोविंद देशमुख, विलास सहकारी साखर कारखाना व्हा. चेअरमन रविंद काळे, ट्वेन्टी वन शुगर्स व्हा. चेअरमन विजय देशमुख, चंद्रकांत मुद्दे, ॲड. गुरुनाथ ब्याळे, गिरीश ब्याळे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकारी, स्थानिक नागरिक उपस्थित होते.

## आयपीएस अधिकारी भाग्यश्री सोनटक्के यांच्यावर गुन्हा दाखल

पुणे : लेडी सिंघम अशी ओळख निर्माण करून पोलिसांचा खाक्या दाखवत गुन्हेगारासाठी कर्दनकाळ ठरलेल्या आयपीएस अधिकारी भाग्यश्री सोनटक्के चांगल्याच अडचणीत आल्या आहेत. जळगावमधील बीएचआर (भाईचंद हिराचंद रायसोनी) पतसंस्थेतील गैरव्यवहारप्रकरणात एकाच दिवशी वेगवेगळे तीन गुन्हे दाखल केल्याप्रकरणी आर्थिक व सायबर गुन्हे शाखेच्या तत्कालीन पोलीस उपायुक्त भाग्यश्री नवटक्के यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गृहविभागाच्या आदेशाने हा गुन्हा नोंदवला गेल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, या प्रकरणावरून पोलिस दलात चांगलीच खळबळ उडाली आहे.

**(पान ७ वर)**



# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या अंमलबजावणीसाठी : जिल्हाधिकारी

लातूर, दि. २९ (जिमाका) : मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांना प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज जिल्ह्यातील साखर कारखाने, महाविद्यालये आणि सहकारी बँकांच्या प्रतिनिधींशी जिल्हाधिकारी कार्यालयात संवाद साधला. जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, सहकारी, खाजगी आस्थापनांनी या योजनेतून युवकांची प्रशिक्षणासाठी निवड करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता केंद्राचे सहायक संचालक बालाजी मरे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था संगमेश्र्वर बदनाळे, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्र निकेतनचे प्राचार्य विशाल नितनवरे, शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतनचे प्राचार्य श्री. बकवाड यावेळी उपस्थित होते.

युवकांमधील नोकरी मिळविण्याची क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण ही अतिशय महत्वाकांक्षी योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेतून निवड करण्यात आलेल्या इयत्ता बारावी पास उमेदवाराला दरमहा ६ हजार रुपये, डिप्लोमाधारक उमेदवाराला ८ हजार रुपये आणि पदवीधारक उमेदवाराला १० हजार रुपये विद्यावेतन दिले जाणार आहे. **(पान ७ वर)**

# हर-हर महादेव च्या गजरात देगलूर - करडखेड पदयात्रा संपन्न

## महिला व मुलींच्या संरक्षणाबरोबरच सुख, शांती आणि शेतकऱ्यांसाठी घातले साकडे

देगलूर (प्रतिनीधी): दर वर्षाप्रमाणे यावर्षीही तालुक्यातील करडखेड येथील प्राचीन हेमाडपंथी महादेव मंदिराच्या दर्शनासाठी श्रावण महिन्याच्या चौथ्या सोमवारी देगलूर ते करडखेड पदयात्रा काढण्यात आली. येरगीचे सरपंच तथा संजय गांधी निराधार अध्यक्ष,भाजपा जिल्हाउपाध्यक्ष संतोष पाटील यांच्याकडून आयोजित पदयात्रेचे हे १२ वे वर्ष असून २६ ऑगस्ट रोज सोमवारी सकाळी ८ वाजता बंडयाप्पा मठ संस्थान गांधी चौक येथून पदयात्रेचा शुभारंभ माजी आमदार सुभाष साबणे व भाजप चे माजी जिल्हाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांच्या शुभ हस्ते विधिवत पूजनाने करण्यात आले.

यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पाटिल बेम्ब्रेकर,अशोक साखरे,नगर पालिका चे मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, गंगाधर पाटील कारेगावकर,सेवानिवृत्त पोलीस उपाधीक्षक रमेश कांतेवार,रमेश जाधव टाकळीकर,एड.रवि पाटील नरंगलकर,अशोक गंदपवार,शैलेश उल्लेवार,प्रशांत दासरवाड ,कैलास येसगे,डॉ.मल्लिकार्जुन रकटे,डॉ. संजय लाडके ,डॉ.रवींद्र भालके,डॉ. राहुल माका ,डॉ. बच्चेवार,सचिन पाटील कारेगावकर,अरुण पाटील रामपुरकर,बसवंत हालदे,वैजनाथ मिसे ,विजय आमटे,मधुकर पाटील,लक्ष्मणराव मुंगडे,संभायाप्पा स्वामी ,चंद्रकांत स्वामी,वैजनाथ स्वामी,विश्वनाथ माळगे,सुभाष स्वामी देगलूरकर ,रणजीत पाटिल,आत्माराम पाटिल,अशोक डुकरे,संजू पांचाळ,अशोक जुबरे,घालप्पा अंबेसंगे,नागनाथ टोंपे,दत्ता पाटिल ,बालाजी ताटे,व्यंकटराव थडके ,शिवकुमार डाकनवाले ,गंगाधर दोसलवार,संतोष आगलावे, प्रताप घाटे, सौरभ मदुरवार, आदि उपस्थित होते .

दरवर्षी हि पदयात्रा येरगीचे सरपंच तथा संजय गांधी निराधार अध्यक्ष,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संतोष पाटील यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात येते. महिला,युवती व बालिकांवरील अत्याचार कमी व्हावेत ,बळीराजाला सुखी ठेवण्यासाठी ,चांगला पाऊस पडावा,दुष्काळ परिस्थिती दूर होण्यासाठी सर्व शिवभक्तांकडून पदयात्रेच्या माध्यमातून करडखेडच्या पूवरिश्वर महादेवाला साकडे घालण्यात आले .

देगलूर ते करडखेड शिवमंदिर पर्यंतचा १५ किमी च्या पदयात्रेत भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी संस्कृति इंग्लिश स्कुल,केतकी संगमेश्वर फार्मर प्रोडूसर कंपनी देगलूर,अशोक मजगे,कारेगाव ला शंकर पाटिल व लक्ष्मण राजुरे,प्रकाशअप्पा कोटचीरकर, प्रकाश पाटील बेमरेकर कावळगाव येथे धोंडू येसगे,बल्लूर फाटा येथे आकाश बिरादार,विशाल पवार,संगम आचेगावे, बोरगाव में बसवंत गोपछडे, किशन राजुरे,डॉ. विनायक मुंडे ,डॉ. कपिल एकलारे ,डॉ. बालुरकर,डॉ. कस्तुरे,अनूप कोटगिरे ,संतोष नारलावार,यांच्याकडून पाणी ,चहा ,साबुदाणा खिचडी,फळे आदींचे वाटप करण्यात आले.





पदयात्रेत शिव स्तुती गायन-भजन ,या बरोबर महिला भजन मंडळीचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला .गुरुराज माऊली च्या नामस्मरणात पाऊले टाकत ,टाळ-मृदंगाच्या गजरात व शिवनामाच्या घोषात ही पदयात्रा बंडयाप्पा मठापासून अण्णाभाऊ साठे चौक,देगलूर महाविद्यालय ,होट्टल फाटा,कारेगाव,बल्लूर फाटा,चाकूर फाटा ,कावळगाव ,बोरगाव मार्गे करडखेड येथील पुवरिश्वर महादेव मंदिरात दुपारी १२.३० वाजता पोहचली . पश्चात तेथे महादेवाची आरती पदयात्रा संयोजक संतोष पाटील व सहभागी शिवभक्तांच्या वतीने करण्यात आली .

पदयात्रेमध्ये शिवभक्तांना त्रास होऊ नये यासाठी देगलूर पोलीस निरीक्षक विश्वनाथ झुंजारे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला. तसेच देगलूर उपजिल्हा रुग्णालयाकडून शिवभक्तांसोबत औषधी व सोबत डॉक्टर्स,नर्स यांची टीम उपलब्ध करून देण्यात आली होती.तसेच ५० युवकांच्या स्वयंसेवकाच्या टीमने पदयात्रेमध्ये सुव्यवस्था व ट्रॅफिक नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष परिश्रम केले.

पदयात्रेत स्वच्छता राखण्यासाठी देगलूर स्वच्छतेचा जागर समितीचे सूर्यकांत सुवर्णकार आणि इतर सदस्यांनी परिश्रम केले.

पदयात्रा यशस्वी करण्यासाठी संयोजक संतोष पाटील,धनाजी जोशी,इरवंत कालिंगवार ,गजानन भोकसखेडे,प्रभाकर कालिंगवार,ऋषिकेश येरगे,शिवकुमार पाटिल,शिवराज इबीतवार, महिला - पुरुष भजनी मंडळ आदींनी परिश्रम केले.




# वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयाचा टेबल टेनिस क्रीडा स्पर्धेत यश

देगलूर(प्रतिनीधी):- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने ब झोन टेबल टेनिस (मुले) क्रीडा स्पर्धा दिनांक २८ ऑगस्ट २०२४ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या त्या स्पर्धेत देगलूर येथील वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयाच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला. त्याबद्दल संघातील खेळाडू आदर्श पाटील बी.एससी प्रथम वर्ष, रमेश देशमुख बी.ए. तृतीय वर्ष, माधव शिवपुजे बी.ए.प्रथम वर्ष ह्या सर्व खेळाडूंचे प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय आवधानी,उपप्राचार्य तथा क्रीडा संचालक डॉ. दिलीप भडके, प्राध्यापक डॉ. भीमराव माळगे, उपप्राचार्य डॉ. कूकाले प्रकाश,धनंजय देशपांडे आदींनी महाविद्यालयातर्फे खेळाडूंचे पुष्पहार घालून विजयी खेळाडूंचे अभिनंदन करण्यात आले.

# विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासावी : तहसीलदार भरत सूर्यवंशी

देगलूर(प्रतिनीधी): अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र अंतर्गत करियर कट्टाचे उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून देगलूरचे तहसिलदार भरत सुर्यवंशी , अ.व्या.शि.संस्थेचे संचालक विजय ऊनग्रतवार , उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार , ऊपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे उपस्थित होते.

बक्षीस वितरण कार्यक्रमात कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विविध विषयातील गुणवंत , क्रीडा क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिस प्रदान करण्यात आले.



करिअर कट्टा अंतर्गत सामान्य ज्ञान परीक्षेतील गुणवंत विद्या र्थ्याचा सत्कार करण्यात आला. तसेच फोरम ऑफ फ्री इंटरप्राईजेस आणि अर्थशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेचा बक्षीस वितरण यावेळी करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना तहसीलदार भरत सुर्यवंशी म्हणाले की , देगलूर सारख्या ग्रामीण भागामध्ये उच्च शिक्षणात नावाजलेले देगलूर महाविद्यालय हे या भागातील विद्यार्थ्यांसाठी एक सुवर्णसंधी आहे. महाविद्यालयातील भव्य ग्रंथालय, क्रीडांगण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व इतर सेवा सुविधा यांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा व वाचन संस्कृती जोपासावी असे विचार मांडले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी महाविद्यालयातील पदवी वी पदव्युत्तर अभ्यास क्रम, संशोधन केंद्र, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र , ग्रंथालय, करिअर कट्टा अंतर्गत आयोजित केलेले आयएएस व आयपीएस अधिकाऱ्यांच्या ऑनलाईन व्याख्यानमाला इत्यादी याविषयी सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. महेश कुलकर्णी तर आभार प्रा. शिवचरण गुरुड़े यानी मानले.

याप्रसंगी पर्यवेक्षक संग्राम पाटील व कार्यालय अध्यक्ष गोविंद जोशी, गुणवंत विद्यार्थी , पालक , प्राध्यापक, व शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त सायकल रॅलीचे आयोजन

लातूर/ प्रतिनिधी- राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल च्यावतीने गुरुवारी राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. २९ ऑगस्ट हा दिवस प्रसिद्ध हॉकी खेळाडू मेजर ध्यानचंद यांचा जन्म दिन राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरी केला जातो. या निमित्ताने स्कूलच्या वतीने भव्य अशा सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.




उपसंचालक आणि जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लाखडे यांनी हिरवा झेंडा दाखविल्यानंतर सायकल रॅलीला सकाळी ७:०० वाजता जिल्हा क्रीडा संकुल येथून प्रारंभ झाला. औसा रोड, शिवाजी महाराज चौक आणि मिनी मार्केट मार्गे स्कूलच्या मैदानावर रॅलीचा समारोप झाला.विद्यार्थी मोठ्या संख्येने सायकल रॅली मध्ये सहभागी झाले होते. रॅली दरम्यान विद्यार्थ्यांनी मखेलेगा इंडिया तो बढेगा इंडिया,फ मभारत माता की जय,फ आणि मवंदे मातरमम अशा घोषणा दिल्या.

क्रीडा अधिकारी धीरज बावणे, बाबासाहेब इंगोले, अरविंद चव्हाण, कृष्णा केंद्रे, जयराम मुंडे आणि प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी प्रमुख अतिथींच्या हस्ते हुतात्मा स्मारकाला अभिवादन करून मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

मुख्य अतिथी जगन्नाथ लाखडे यांनी आपल्या भाषणात क्रीडाचे महत्व विशद केले आणि राज्य सरकार द्वारा उत्कृष्ट खेळाडूंना जाहीर करण्यात आलेल्या पुरस्कारांची माहिती दिली. विनोद चव्हाण यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले, तर सुनील मुनाळे यांनी आभार मानले. रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर, कॅप्टन बीके भालेराव, शैलेंद्र डावळे, सुनिता झुंजे, प्रियंका गडदे आदींनी परिश्रम घेतले.

# वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय ई-परिषदेचे आयोजन

देगलूर (प्रतिनिधी) : वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयातील भूगोल, आय. क्यू.ए.सी. विभाग व ग्लोबल फाउंडेशन इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने द नोशन्स ऑफ वॉटर, एनर्जी, क्लायमेट, अर्बनायझेशन, सोशल, इकॉनॉमीक इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट, सायन्स अँड टेक्नॉलॉजी फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट या विषयावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या मान्यतेने शुक्रवार दिनांक ३० ऑगस्ट २०२४ रोजी आंतरराष्ट्रीय ई-परिषद संपन्न होणार आहे. या ई-परिषदेचे उद्घाटक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर हे ऑनलाइन उपस्थित राहणार असून समारोप स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. पराग खडके यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या ई-परिषदेत बीजभाषक म्हणून डॉ. प्रवीण सप्तर्षी (व्हिजिटिंग प्रोफेसर, सैलिसबरी युनिव्हर्सिटी, यू.एस.ए.) यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. साधन व्यक्ती म्हणून श्रीलंकेतील केलेनिया विद्यापीठातून प्रोफेसर ए.जी. अमरसिंगे, गुवाहाटी (आसाम) हून डॉ. तुष्टी शर्मा हे उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत तर सत्राध्यक्ष म्हणून डॉ. करंडे सुभाष, डॉ. येडगे अनिल, डॉ. प्रकाश रोडिया इत्यादीचे मार्गदर्शन लाभणार आहे. या ई-परिषदेसाठी देश विदेशातून एकूण ९० पेक्षा अधिक शोधनिबंधाचे विविध सत्रात समांतर वेळेत वाचन होणार आहे तसेच निवडक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जर्नल मध्ये प्रकाशित केले जाणार आहेत. मुक्ताई प्रतिष्ठानचे सचिव मा. राजेश महाराज देगलूरकर हे या परिषदेत शुभेच्छा संदेश देणार असून आभासी पद्धतीने संपन्न होणाऱ्या या आंतरराष्ट्रीय ई-परिषदेसाठी शिक्षक- प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी वृंदांनी उपस्थित रहावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय अवधाने, उपप्राचार्य डॉ. दिलीप भडके, भूगोल विभाग प्रमुख डॉ. भीमराव माळगे व डॉ.आनंद वळंकीकर यांनी केले आहे.

# टाळ सप्ताह म्हणजे श्रावणमास अनुष्ठानातील एक महत्वाची साधनाच : ह. भ. प.श्री ज्ञानराज महाराज

**ॲड. शाम कुलकर्णी**

औसा प्रतिनिधी- सद्गुरु दासवीरनाथ महाराजांनी अत्यंत कल्पकतेने व तळमळीने श्रावणमास तपोअनुष्ठानाची कृपा प्रासादिक उपासना दिली यात प्रपंच चक्रातून मुक्त करणारे चक्रीभजन श्रीकृष्ण जन्माष्टमी ची साधना गोवर्धन उत्सव सोहळा आणि सलग एक आठवडा नाथ मंदिरात अखंड टाळ सप्ताह सेवा असा नित्यनेम देऊन सद्भक्तांना भक्तीत एकरूप ठेवले असे प्रतिपादन ह भ प श्री ज्ञानराज महाराज यांनी केले आहे.



श्रावण आरंभापासून सायंकाळी नाथ मंदिरातील नित्य प्रासादिक चक्रीभजनानंतर ग्रंथराज श्री ज्ञानेश्र्वरी वर निरूपण करताना महाराज बोलत होते. अठराव्या अध्यायातील नव्या श्र्लोकातील उभी क्रमांक ५,६,७,८, या ओव्यांवर श्री ज्ञानराज महाराज माऊली यांनी ज्ञानेश्र्वरीवर आपल्या मधुर वाणीतून अगदी रसाळ असे निरूपण करून महिनाभर नाथ मंदिरात नित्याने माळसेवेत असणाऱ्या सर्व सदभक्तांना विशेषतः तरुण नवीन भाविकांना प्रवचन श्रवणाची गोडी निर्माण केली. साध्या सोप्या पण संतकथा आणि धर्मग्रंथातील संदर्भ देत त्यांनी सुंदर असे विवेचन मांडून श्रवणीय केले.

टाळाटाळी लोपला नाद, ब्रम्हानंदी मुरला छंद मुखाने म्हणा हो हरी गोविंद ..असा हा टाळ घेऊन नेमाची सेवेकरी नाथ मंदिरात एक आठवडा स्वयंभू विठ्ठलापुढे व सद्गुरूंच्या पावन समाधीपुढे विठ्ठल नाम घेत उभे आसतील. पांडुरंगाची व सद्गुरूंची आरती करून टाळांचे पुजन करून ज्ञानराज महाराजांनी ज्ञानदेव तुकाराम जयघोषात हा टाळसप्ताह उभा केला.

संसारिक व परमार्थ यांच्या दृष्टीने सुखाच्या व्याख्या वेगवेगळ्या आहेत संत तर सर्व सुखाचे आगर बाप रखुमादेवीवरू तो हा विठ्ठल बरवा तो हा माधव बरवा , असे विठ्ठल भक्तीत सुख मानणारे तर भौतिक सुखाच्या लालसेने आयुष्यभर इच्छानाआवर न घालता लोभ मोहापोटी धावा धाव करणारी संसारीक होत. शाश्र्वत आणि परमसुख देणारे नामस्मरण अनुष्ठान संतसेवा हीच खरी साधना आहे,जी आपल्याला आत्मिक आनंद समाधान देणारी आहे जीवन चक्रातून बाहेर काढणारीअसल्याचे महाराज म्हणतात. मंगळवारी परंपरेची नाईकवाडे परिवारांची माळ होती तसेच सोलापूरच्या शोभाजी तपासे राजकुमार चव्हाण ,राजेंद्र चव्हाण वसंत महामुनी, श्री आप्पाबाबा महाराज व कलदेव लिंबाळा येथील सर्व ग्रामस्थ मंडळी यांनी गुरुचरणी आपली माळ सेवा रुजू केली .

# राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

धाराशिव दि.२९ (प्रतिनिधी) - राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त दि.२६ ते २९ ऑगस्ट दरम्यान विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धा क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्यावतीने आयोजित करण्यात आल्या होत्या.

जिल्हास्तर, तालुकास्तर शालेय योगासन, फुटबॉल, क्रिकेट, बॅडमिंटन, कुस्ती, व्हॉलीबॉल तसेच जिल्हास्तर शालेय हॉकी व नेहरु हॉकी, ज्युदो, बुध्दीबळ क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियममध्ये लहान मुलांच्या लिंबू चमचा शर्यत, दोरी उड्या स्पर्धा, ४० ते ६० वर्षापर्यंतच्या नागरिकाच्या चालणे, जलद चालणे, धावणे कॅरम, तायक्कांदो, हॉकी (पेनल्टी शुट आऊट) आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. क्रीडा भारती व विविध एकविध क्रीडा संघटना आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने खेळाचे महत्व व त्यामधील संधी या विषयासह राष्ट्रीय क्रीडा दिन का साजरा करण्यात येतो. याचे महत्व व खेळाचे महत्व याविषयी क्रीडा भारतीचे मिलींद डांगे यांनी माहिती दिली. क्रीडा भारतीचे राजेंद्र कुलकर्णी यांनीही खेळाचे महत्व विषद करुन त्यामध्ये विविध क्षेत्रामध्ये संधी मिळतात. याबद्दल माहिती दिली. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते विविध स्पर्धेत प्राविण्य संपादन करणाऱ्या खेळाडूंना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तर दि.२९ ऑगस्ट रोजी अभिनव इंग्लिश स्कुल येथे क्रीडा दिनाचा मुख्य कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले. यावेळी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी अकुंश पाटील व राजकुमार सोमवंशी तसेच नायब तहसिलदार घृष्णेश्र्वर स्वामी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. राजस्थानी बहुउद्देशिय संस्थेचे अध्यक्ष सतिश मोदानी व शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी अकुंश पाटील यांनी विद्यार्थ्यांना मेजर ध्यानचंद यांच्या कार्याची व जीवनामध्ये खेळाचे महत्व याची माहिती दिली. शाळेतील राज्य स्पर्धेत प्राविण्य संपादन केलेल्या खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.विविध स्पर्धेत प्राविण्य संपादन केलेल्या खेळाडूंचा प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.अभिनव इंग्लिश स्कुल,धाराशिवच्या प्राचार्या प्रतिभा सतिश मोदाणी यांनी खेळाडूंना बहुमोल असे मार्गदर्शन केले.आभार क्रीडा अधिकारी भैरवनाथ नाईकवाडी यांनी मानले.

# वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात क्रिडा दिन उत्साहात साजरा




देगलूर(प्रतिनीधी): क्रिडा दिनाच्या निमित्ताने औचित्य साधून वै. धुंडा महाराजमहाराज देगलूरकर महाविद्यालय देगलूर क्रिडा विभागाच्या वतीने तालुका बॅडमिंटन क्रिडा संकुलात बॅडमिंटनची एकेरी दुहेरी स्पर्धा घेण्यात आली.

या कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी माजी बॅडमिंटन विद्यापीठ खेळाडू कु. वैष्णवी देगावकर यांच्याकडून मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उप प्राचार्य तथा क्रिडा निर्देशक प्रा. डॉ. दिलीप भडके यांनी क्रिडा दिनानिमित्त शारीरिक शिक्षण व क्रिडा यांचे महत्त्व उपस्थित खेळाडूंना आपल्या भाषणात सांगितले व मेजर ध्यानचंद यांच्या खेळाविषयी सविस्तर इतिहास सांगितला. या कार्यक्रमासाठी देगलूर महाविद्यालय देगलूर बॅडमिंटन खेळाडू कू. सृष्टी इंगोले, कु. पल्लवी सूर्यवंशी, कु. मयुरी गजलवाड, गोरोबा इबीदार, विशाल वाघमारे, केदार बंदामवार व वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयाचे खेळाडू कु. वैष्णवी जाधव, कु. कु. शेख नाझिया, कु. रागिणी गुरफळे, रमेश देशमुख,माधव शिवपुजे,आदर्श पाटील, घुमलवाड वैभव,उसकीलवाड कुमार माधव व इतर विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# यशवंत धाराशिव जिल्हा

शुक्रवार दि. ३० ऑगस्ट २०२४

३



कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com


## कराटे स्पर्धेत तामलवाडी व सुरतगाव येथील विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

धाराशिव दि.२९ (प्रतिनिधी) – छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या पहिल्या ओपन इंटरनॅशनल शोतोकान कराटे स्पर्धेमध्ये तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी, सुरतगाव येथील विद्यार्थ्यांनी दि.२५ ऑगस्ट रोजी घवघवीत यश प्राप्त केले. छत्रपती संभाजीनगर येथे ओपन इंटरनॅशनल कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये धाराशिव जिल्ह्यातील १३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये काता व कुमिते या प्रकारात विहान रोडे याने १ गोल्ड व १ ब्राँझ पदक, अमनकुमर बिंद १ गोल्ड व १ ब्राँझ पदक, अर्पिता गुंड २ सिल्व्हर, विहान रोडे १ सिल्व्हर व १ ब्राँझ पदक, स्वरूप बनसोडे १ सिल्व्हर व १ ब्राँझ पदक, आर्या गवळी २ ब्राँझ पदक, राजश्री गुंड २ ब्राँझ पदक, गौरवी गुंड २ ब्राँझ पदक, ज्ञानेश्वरी डोके २ ब्राँझ पदक, नोमन शेख १ व सिल्वर १ ब्राँझ, संगीता कुंभार ३ ब्राँझ, ओंकार कुंभार २ ब्रॉन्झ व वैष्णवी कुंभार २ सिल्व्हर या खेळाडूंनी वरील पदकांची कमाई केली असून जिल्ह्याच्या शिरपेचात कराटेरुपी तुरा रोवून जिल्ह्याची मान उंचावली आहे. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक दिनकर रोकडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



# जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवाचे जाधव यांच्या हस्ते उद्घाटन

धाराशिव दि.२९ (प्रतिनिधी) – आरोग्यासाठी विविध गुणसंपन्न असलेल्या आणि मानवी आहारात प्रमुख मेजवानी ठरणाऱ्या रानभाज्यांचा जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सव कृषि विभाग व आत्माच्यावतीने दि. २८ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला. महोत्सवाचे उद्घाटन पोलिस अधिक्षक संजय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान, यावेळी रानभाज्यांची मांडणी, रेसिपी व सादरीकरण करणाऱ्या २५ उत्कृष्ट शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी व वैयक्तिक शेतकऱ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

धाराशिव शहरातील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या परिसरात जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) चे प्रकल्प संचालक खंडेराव सराफ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिगंबर पेरके, केव्हीकेचे कार्यक्रम समन्वयक सचिन सुर्यवंशी, माविमच्या जिल्हा समन्वय शोभा कुलकर्णी, वॉटर संस्थेचे व्यवस्थापक कांतीलाल गिते, प्रकल्प उपसंचालक अभिमन्यू काशीद, कृषि विकास अधिकारी पी.जी. राठोड, उपविभागीय कृषि अधिकारी महादेव आसलकर, तालुका कृषि अधिकरी एस.पी. जाधव आदी उपस्थित होते.

> या महोत्सवात जिल्ह्यातील विविध भागातून विविध प्रकारच्या रानभाज्या घेवून महिला–पुरुष सहभागी झाले होते. महोत्सवात जवळपास सर्वच भाज्या या सेंद्रीय पध्दतीने आणि माळरानावर येणाऱ्या भाज्या होत्या. त्यामुळे त्या खरेदीसाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. त्यातून हजारो रुपयांची उलाढाल झाली आहे. या महोत्सवात धाराशिव शहर आणि ग्रामीण भागातील नागरिकांनी भेट देऊन रानभाज्या व रानफळांची माहिती घेतली.

जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवास जिल्ह्यातील महिला शेतकरी गट, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी व शेतकरी यांनी सहभाग नोंदविला. रानभाज्या व रानफळांची होती. यामध्ये करटुले, हादगा, चिघळ, तांदुळाजा, लसूणपात, कुरडू, पाथरी, कढीपत्ता, आघाडा, अंबाडी, बांबू, केना, आळूचे पान, उंबर, पिंपळ, शेवगा, कपाळपुटी, गुळवेल, कोरफड, फांजी, वासनवेल, काटेमाठ, सराटा, ओवापान, कवठ यासह ८० पेक्षा जास्त रानभाज्या व रानफळे विक्रीसाठी उपलब्ध होते. भाज्यांची मेजवानी नागरिकांनी या महोत्सवातून नागरिकांना मिळाली. तसेच यावेळी काही औषधी भाज्याही होत्या. रानभाज्यापासून तयार केलेल्या विविध पदार्थाचा आस्वाद घेण्यासाठी व त्याचे गुणधर्म जाणून घेण्यासाठी शहरातील नागरिकांनी गर्दी केली होती.



## बांगला देशातील हिंदूवरील अत्याचाराच्या निषेधार्थ हिंदू रौद्र मोर्चा

धाराशिव दि.२९ (प्रतिनिधी) – मागील काही दिवसांपासून बांगलादेशमध्ये झालेल्या हिंदूवरील अन्याय अत्याचाराच्या विरोधात धाराशिव शहरात सकल हिंदू समाजाच्यावतीने हिंदु रौद्र मोर्चा दि.२७ ऑगस्ट रोजी काढण्यात आला. दरम्यान डॉ बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच शिवरायांचा आठवावा प्रताप या प्रार्थनेने मोर्चाची सांगता करण्यात आली.

धाराशिव शहरातील राजमाता जिजाऊ चौकात जिजाऊंना अभिवादन करून लेडीज क्लब, पोस्ट कार्यालय, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चेकऱ्यांनी डोक्यावर भगवी टोपी व हातात भगवे झेंडे घेऊन विविध घोषणा देत परिसर दणाणून सोडला.

मोर्चामध्ये सहभागी असलेल्या प्रतिनिधींनी बांगला देशातील हिंदूंच्या रक्षणासाठी भारत सरकारने प्रयत्न करावेत. तसेच त्यांची सुरक्षा व त्यांचे जीव वाचावे यासाठी हस्तक्षेप करावा. तर त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी भारत सरकारने मदत करावी. मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळलेल्या पुतळ्याच्या ठिकाणी त्वरित पुतळा उभारावा आणि दोषींवर कठोर कारवाई करावी आदी मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या मोर्चात नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



## सीएससी केंद्राच्या माध्यमातून वृक्ष लागवड

धाराशिव दि.२९ (प्रतिनिधी) – एक पेड माँ के नाम अभियान अंतर्गत जिल्ह्यातील सीएससी केंद्राच्यावतीने वृक्ष लागवड करण्यात आली.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शासकीय व सामाजिक पातळीवर दरवर्षी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येते. तर लावलेले वृक्ष जगविण्यासाठी देखील विशेष प्रयत्न केले जातात. एक पेड माँ के नाम या मोहिमे अंतर्गत जिल्ह्यातील सर्व कॉमन सर्विस सेंटर अर्थात सीएससी चालकांच्या माध्यमातून वृक्ष लागवड करण्यात आली आहे. यामध्ये फळवर्गीय व इतर देशी वृक्षांचा समावेश आहे. ही लागवड कॉमन सर्विस सेंटरचे जिल्हा व्यवस्थापक रमजान पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली व येत आहे.



## राज्यस्तरीय पुरस्काराने राहुल बनसोडे सन्मानित



परंडा दि.२९ (प्रतिनिधी) – पंढरपूर येथे बळीराजा शेतकरी संघटनेच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे यांना राज्यस्तरीय पुरस्कार खा.प्रणितीताई शिंदे यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी सहकार शिरोमणी साखर कारखान्यांचे चेअरमन कल्याणराव काळे, विठ्ठल साखर कारखान्याचे चेअरमन भगीरथ भालके, श्री विठ्ठल– रूक्मिणी मंदिराचे विश्वस्त अध्यक्ष हभप गहिनीनाथ औसेकर म्हाराज, बळीराजा शेतकरी संघटनेचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष नितिन बागल, प्रदेश संपर्क प्रमुख रमेश गणगे, सचिव रामदास खराडे, राष्ट्रवादी उद्योग व्यापार सेलचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे, मराठवाडा अध्यक्ष विकास औताडे, पुज्यनगरीचे संपादक निसार मुजावर, घनश्याम शिंदे, डॉ.नवनाथ वाघमोडे, कृष्णा चौधरी, तानाजी सोनवणे आदी उपस्थित होते. याबद्दल बनसोडे यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

## डॉ.आंबेडकर कारखान्याची सर्वसाधारण सभा संपन्न





धाराशिव दि.२८ (प्रतिनिधी) – तालुक्यातील केशेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात व सभासदांच्या उपस्थित कारखाना स्थळावर दि.२८ ऑगस्ट रोजी पार पडली. दरम्यान, प्रारंभी अहवाल सालातील दिवंगत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

धाराशिव तालुक्यातील केशेगाव येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर सहकारी कारखाना स्थळी आयोजित सर्वसाधारण सभेत बोलताना संस्थापक अध्यक्ष, सहकार रत्न, मराठवाडा भूषण अरविंद गोरे यांनी आजपर्यंतच्या कारखान्याच्या वाटचालीचा आलेल्या अडचणीचा आणि वेळोवेळी सभासदाने दिलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल सविस्तर आढावा घेऊन कारखान्याच्या वेगवेगळ्या उपक्रमाची आठवण करून दिली. तसेच येत्या चालू हंगामात जे शेतकरी १५ नोव्हेंबरपर्यंत ऊस रोपांची लावण करतील. त्यांना कारखान्याच्यावतीने हेक्टरी ५ हजार रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त ऊस उत्पादकांनी ऊस रोपांची लागवड करुन या योजनेचा फायदा घ्यावा, असे आवाहन केले. तर सभेतील सर्व विषयांचे वाचन कार्यकारी संचालक डाके यांनी केले. तसेच संचालक ॲड. निलेश बारखडे पाटील यांनी उपस्थित आमचे आभार मानले. या सभेसाठी कारखान्याचे संचालक, सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, अधिकारी, कर्मचारी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रेम प्रकरणातून मुलीच्या भावाने अक्षयला धमकावले अन् चक्क कायमचा काटाच काढला

## आरोपी विरोधात ॲट्रॉसिटी दाखल; मात्र आरोपी मोकाट




नळदुर्ग दि.२९ (प्रतिनिधी) – येथील अक्षय बाळू सुरवसे हा युवक अशक्तपणा आल्यामुळे नळदुर्ग येथील धन्वंतरी क्लिनिक येथे सलाईन लावून घेण्यासाठी गेलेला होता. परंतू अक्षयची प्रेमिका त्या क्लिनिकमध्ये नर्स म्हणून काम करत असल्यामुळे मनीषा राठोडने अक्षयला सलाईन लावली गेली. नंतर ती सलाईन संपल्या नंतर अचानकपणे अक्षय बेशुद्ध पडला आणि त्याच्या तोंडातून फेस येऊ लागला. तेव्हा अक्षयचा फोन घेऊन मनिषा राठोड अक्षयचे मित्र राजेश बनसोडे व सुरज सुरवसे यांना फोन करून बोलावून घेतले. त्यानंतर धन्वंतरी क्लिनिकमधून हलविण्यात येऊन डॉ पाटील क्लिनिकमध्ये दाखल केले. तेथील डॉ जितेंद्र पाटील यांनी तात्काळ सोलापूरला जाण्यास सांगितल्यामुळे संबंधीत पेशंटची तब्येत खुप बिघडली आहे. त्यासाठी लवकरात लवकर सोलापूर छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर येथील डॉक्टरने अक्षयला मयत घोषित केले. सोलापूर पोलिसांनी संबंधितांच्या विरोधात एमएलसी दाखल केली आहे. संबंधित आरोपी वसंत नगर नळदुर्ग येथील असून संदीप राठोड व सुशील राठोड याने गेल्या ८ दिवसांपूर्वी अक्षयला तु माझ्या बहिणीचा नाद सोड नाहीतर तुला संपावतो अशी धमकी दिली होती. ज्या पद्धतीने धमकी दिली, त्याच पद्धतीने फक्त केवळ ८ दिवसांमध्ये अक्षयला सलाईन लावणे, अर्धी सलाईन झाल्यानंतर तो बेशुद्ध होणे हा प्रकार खूप भयानक वाटला. याबद्दल संशयित म्हणून डॉ बालाजी जाधव यांचे नाव असून वरील आरोपींना तात्काळ अटक करावी या मागणीसाठी अक्षय सुरवसे यांचे प्रेत घेऊन बाजारपेठेतून पोलीस स्टेशनकडे नेण्यात आले. संबंधित पोलिस ठाणे नळदुर्ग येथे गेट समोर प्रेताची गाडी उभा करून संबंधितावर गुन्हा नोंद करावा. यासाठी सर्व समाज बांधवांनी जोर धरला. पोलिसांकडून आरोपी विरोधात गुन्हा नोंद करण्यास टाळाटाळ करण्यात आली. नंतर संबंधित पोलीस उपविभागीय अधिकारी निलेश देशमुख यांच्याशी संपर्क साधून त्यांना तात्काळ नळदुर्ग येथे बोलविण्यात आले. त्यानंतर निलेश देशमुख, पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे, संबंधित आरोपी मनीषा राठोड, संदीप राठोड व सुशील राठोड यांच्या विरुद्ध कलम १०५ , ३५१ (२) ३ (२) ३ (२) (तर) अनु जाती जमाती प्रतिबंध कायदयानुसार गुन्हा नोंद करण्यात आला. तर धन्वंतरी क्लिनिकचे डॉ बालाजी जाधव हे संशयित आरोपी म्हणून असणार आहेत. वरील सर्व आरोपी सध्या मोकाट असून त्यांचा तपास लागत नसल्याने नागरिकांत संतापाची लाट निर्माण झाली आहे. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी देशमुख हे करीत आहेत.

# सुप्रसिद्ध मेंदू विकार तज्ञ डॉ. आनंद मुदकण्णा यांचे निधन

## शहर व परिसरात शोककळा

मुरूम दि.२९ (प्रतिनिधी) – मुरूमचे सुपुत्र प्रख्यात मेंदू विकार तज्ञ (न्यूरोलॉजिस्ट) डॉ. आनंद लिंबणप्पा मुदकण्णा यांचे सोलापूर येथील खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. अल्पावधीतच त्यांनी वैद्यकीय क्षेत्रामध्ये उतुंग भरारी घेतली होती. सोलापूर शहरात भव्य स्पर्श न्यूरो केअर हॉस्पिटल काढून रुग्णांची सेवा करत होते. त्यांचा स्वभाव मनमिळावू, संवेदनशील व अभ्यासू असल्याने राज्यातील व राज्या बाहेरील देखील हजारो रुग्ण त्यांच्याकडे उपचारासाठी येत असत. रुग्णांचा त्यांच्यावर मोठा विश्वास असल्याने त्यांचा रुग्णांना आधार वाटायचा. डॉ. मुदकण्णा हे महाराष्ट्रातील नावाजलेल्या न्यूरोलॉजिस्टपैकी एक सुप्रसिद्ध डॉक्टर होते. त्यांचे वडील डॉ. लिंबणप्पा मुदकण्णा हे अनेक वर्षांपासून वैद्यकीय सेवेत कार्यरत आहेत. डॉ. आनंद मुदकण्णा यांचे १० वी पर्यंतचे शिक्षण अकलूज येथे झाले. उमरगा येथे ११ वी, १२ वी तर एमबीबीएसचे शिक्षण अंबेजोगाईला पूर्ण केले. त्यांचे एमडीचे शिक्षण सोलापूर येथे तर डीएम न्यूरोलॉजीचे शिक्षण मुंबई विद्यापीठात टॉपर विद्यार्थी म्हणून पूर्ण केले. त्यांना वैद्यकीय क्षेत्रातील सेवेबद्दल विविध संस्था, सामाजिक संघटनांनी पुरस्कार देवून सन्मानित केले होते. कोरोना काळात ही त्यांनी रुग्णांची तत्परतेने सेवा केली. त्यांनी जवळपास २० वर्ष वैद्यकीय क्षेत्रात योगदान दिले. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये त्यांच्या विविध रुग्णालयात भेटीचे दिवस ठरलेले असायचे. त्यांच्या निधनाची वार्ता कळताच मुरूम शहर व जिल्हाभर शोककळा पसरली.



त्यांच्यावरती कंटेकुर रोडवरील शेतामध्ये दि.२८ ऑगस्ट रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिकांनी अंतिम दर्शन घेतले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई–वडील, एक मुलगा, एक मुलगी, एक भाऊ असा परिवार आहे. मुरूमचे डॉ. लिंबणप्पा मुदकण्णा यांचे ते ज्येष्ठ चिरंजीव होते.

# सकारात्मक बदलासाठी युवकांनी राजकारणात यावे : अजित पाटील कव्हेकर



लातूर/ प्रतिनिधी : लातूरमधील काँग्रेसचे नेते भारतीय जनता पार्टीचा उमेदवार आम्ही ठरवतो असे सांगून लोकांमध्ये संभ्रम निर्माण करत आहेत.त्यासाठी इथल्या युवकांनी राजकारणात येऊन विरोधकांचा हा खोटा नरेटिव्ह पुसून काढावा,असे आवाहन भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले.

बुधवार (दि.२८) रोजी संवाद लातूरकरांशी या उपक्रमांतर्गत ते लातूर शहरातील प्रत्येक गल्ली,कॉलनीत जात आहेत.नागरिकांच्या समस्या ऐकून घेत आहेत. संवाद लातूरकरांशी या उपक्रमाचा बुधवारी सहावा दिवस होता.

लातूर शहर मतदार संघातील लोकांच्या अडीअडचणी जाणून घेणे ही माझी जबाबदारी असून त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणे हे माझे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. भारतीय जनता पक्षाने लोकांच्या हिताची केलेली चांगली कामं लोकांपर्यंत पोहोचवण्याचा माझा या यात्रेच्या माध्यमातून प्रयत्न आहे.जगातील सर्वात मोठ्या पक्षाला लातूर काँग्रेसचे नेते भारतीय जनता पार्टीचा उमेदवार आम्ही ठरवतो असे म्हणत असतील तर तो निव्वळ विनोदाचा भाग आहे असे ङ्कसांगत त्यांनी काँग्रेस नेत्यांची खिल्ली उडवली. ज्या पक्षाचे २४० खासदार,२५०० आमदार आणि सतरा,अठरा राज्यात सत्ता आहे अशा पक्षाला ते मॅनेज करू शकत असतील तर हे हास्यास्पद आहे,असे ते म्हणाले. भारतीय जनता पार्टीत लातूर शहर मतदार संघासाठी अनेक चेहरे इच्छुक असले तरी मी सध्या घरोघर फिरून लोकांच्या समस्या जाणून घेतोय.त्यावर काय उपाययोजना करता येतील हा विचार करतो आहे. उमेदवारी हा भाग पुढचा असल्याचे त्यांनी सांगितले.

संवाद लातूरकरांशी या उपक्रमाच्या माध्यमातून बुधवारी साईबाबा मंदिरापासून सुरू झालेली यात्रा विशाल नगर,घरकुल सुपर मार्केट, विक्रम नगर,नवभारत शाळा,महादेव मंदिर,बोधी चौक,श्रावस्ती बौद्ध विहार,जयंती मैदान, रामजी नगर,खुशी ग्राम, वसंतराव नाईक चौक,श्री स्वामी समर्थ मंदिर या भागात पोहोचली.

यावेळी या रॅलीत भाजपा महिला मोर्चा लातूर शहर अध्यक्षा रागिणीताई यादव, ओबीस महिला मोर्चा अध्यक्षा सौ.हेमाताई येळे, मंडलाध्यक्ष आबा चौगुले, संजय गिर, मंडल सरचिटणीस संगिता शिंदे, शक्तीकेंद्र प्रमुख दीपक घाडगे, बुथ प्रमुख मिरकले गणेश, वनारसे वैभव, भाग्यश्रीताई शहरकर, उज्वलाताई कांबळे, यशपाल गायकवाड, विजय घाडगे, ॲड.गणेश गोजमगुंडे, सागर घोडके, उत्तम सूर्यवंशी,बाळू शिंदे, गजेंद्र बोकण, मंदार कुलकर्णी, संतोष तिवारी, गणेश खाडप, अरुण जाधव, सचिन जाधव, प्रमोद मोकाशे, विनोद मोकाशे, प्रतिक मोकाशे तसेच स्वामी समर्थ नगर मधील ज्येष्ठ नागरिक देवणे साहेब, मोरे साहेब, जगदाळे साहेब, स्वामी साहेब यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# मेजर ध्यानचंद यांनी हॉकीला विश्वव्यापकता मिळवून दिली : क्रीडासंचालक डॉ.वैशाली माढेकर

बाभळगाव : हॉकीचे जादूगार म्हणून ओळखले जाणारे मेजर ध्यानचंद यांनी हॉकीला सुवर्णपदकापर्यंत पोहचविले. हिटलर यांनी त्यांचे कौतुक केले. भारत सरकारने त्यांना पद्मभूषण देऊन त्यांचा गौरव केला. मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार त्यांच्या नावाने दरवर्षी दिला जातो. त्यांचा जन्मदिवस खेळ दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांनी अथक परिश्रम करून हॉकी या दुर्लक्षित खेळाला विश्वव्यापकता मिळवून दिली. असे प्रतिपादन क्रीडा संचालक प्रा. डॉ. वैशाली माढेकर यांनी व्यक्त केले.

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय बाभळगाव येथे मेजर ध्यानचंद यांच्या जयंती दिनाच्या निमित्ताने क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात क्रीडासंचालक डॉ.वैशाली माढेकर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे हे होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नाना जाधव, सूत्रसंचालन साहिल समदुरले यांनी केले. कार्यक्रमाला स्टाफ सचिव डॉ. जयदेवी पवार, डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ. अभिजीत बादाडे, डॉ. इंद्रजीत शिंदे, प्रा.विवेक कदम, प्रा. पवार डी. एम.,राजकुमार कांबळे, हनुमंत शिंदे, प्रकाश मेहरकर यांची उपस्थिती होती. आभार प्रा. महारुद्र बिडवे यांनी मांनले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्ता फुलगामे, नितीन पाटील, अंकुश थडकर, मजर शेख , दत्ता गुंडे, ऋषी रेनके ,कार्तिक मस्के, यांनी परिश्रम घेतले.

# शक्ती कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी स्वाक्षरी मोहीम

## शिवसेना (ठाकरे) युवतीचा पुढाकार




धाराशिव दि.२९ (प्रतिनिधी) – राज्यात बालिका मुली व महिला यांच्यावर गाव खेड्यापासून महानगरीय शहरापर्यंत अतोनात छेडछाड, बलात्कार व अत्याचार होत आहेत. मात्र याला आवर घालण्यासाठी सरकार कुठलीच भूमिका घेत नाही. आघाडी सरकारच्या काळात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महिलांच्या सुरक्षेसाठी खास शक्ती कायदा केलेला आहे. मात्र त्याची अंमलबजावणी अद्याप पर्यंत केली नसल्यामुळे नराधमांचे मनोधैर्य वाढवून ते महिलांवर अत्याचार करीत सुटले आहेत. त्यामुळे तात्काळ शक्ती कायद्याची अंमलबजावणी करावी यासाठी जनजागृती व्हावी म्हणून शिवसेना (ठाकरे) युवती आघाडीच्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनींची स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे. धाराशिव येथील आर.पी. कॉलेज येथे ही मोहीम आ कैलास पाटील, जिल्हा संपर्कप्रमुख मकरंद राजेनिंबाळकर, शंकर बोरकर, युवती सेनेच्या लोकसभा विस्तारक स्वाती बोरकर यांच्या हस्ते यांच्या उपस्थितीत प्रारंभ दि.२९ ऑगस्ट रोजी करण्यात आला. दरम्यान, यावेळी महाविद्यालयीन युवक व युवतींनी सह्या केल्या.

बदलापूर येथे बालिकेवर अत्याचार करण्यात आला तर पुण्यामध्ये देखील त्या पाठोपाठ असाच प्रकार पहिले बाबत घडला आहे. तसेच धाराशिव जिल्ह्यातील राज्याच्या विविध भागात बालिका मुली व महिलावर सातत्याने बलात्कार व अत्याचार मोठ्या प्रमाणात केले जात आहेत. याला आळा घालण्यासाठी महाआघाडी सरकारच्या काळात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महिला सुरक्षेसाठी तयार केलेला सुरक्षा कायदा लागू करावा अशी मागणी केली आहे. कारण या कायद्यामध्ये १६ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलीवर अत्याचार करणाऱ्यास मरेपर्यंत जन्मठेप, बलात्कार प्रकरणी अजामीनपात्र गुन्हा, दुर्मिळात दुर्मिळ प्रकरणात फाशीच्या शिक्षेची तरतूद, ओळखीतल्या व्यक्तीने बलात्कार केल्यास जन्मठेप किंवा मरेपर्यंत जन्मठेप आणि दंड, सामूहिक बलात्कार करणाऱ्यांना वीस वर्षे कठोर जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद किंवा करण्यात आलेली आहे. मात्र या कायद्याची अंमलबजावणी महायुती सरकारने अद्यापपर्यंत केलेली नाही. त्यामुळे त्या कायद्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी या मागणीसाठी ही मोहीम राबविण्यात आली. यावेळी आमदार कैलास दादा पाटील शिवसेना सहसंपर्कप्रमुख शंकरराव बोरकर, शिवसेना सहसंपर्कप्रमुख माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर, युवासेना जिल्हाप्रमुख अक्षय ढोबळे, शिवसेना शहरप्रमुख सोमनाथ गुरव, उपजिल्हाप्रमुख विजय सस्ते, युवती सहसचिव मनिषा वाघमारे, जिल्हा समन्वयक अँड संजय भोरे, युवासेना उपजिल्हाप्रमुख राणा बनसोडे, कालेज कक्ष प्रमुख ऋअविनाश शेरखाने, युवासेना जिल्हा सचिव शिवयोगी चपणे, उपशहरप्रमुख सुरेश गवळी, युवासेना जिल्हा सहसचिव अजय धोंगडे, रवि कोरे आळणीकर देवानंद एडके, मधूकर बोंदर, अश्र्विन लिंगे आदीसह शिवसैनिक उपस्थित होते. या मोहिमेस महाविद्यालय विद्यार्थी विद्यार्थिनींनी मोठा प्रतिसाद दिला. या सह्यांचे निवेदन राष्ट्रपतींना देण्यात येणार आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्या प्रकरणी सखोल चौकशी करण्याची मागणी



उमरगा दि.२९ (प्रतिनिधी) – मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्या ही घटना मराठी अस्मितेला काळीमा फसणारी आहे. या पुतळा उभारणीच्या कामांमध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असून त्याची सखोल चौकशी करावी अशी मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष संजय पवार यांनी तहसिलदारांमार्फत एका निवेदनाद्वारे राज्यपालांकडे दि.२९ ऑगस्ट रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, साडेआठ महिन्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविला होता. त्याचे उद्घाटन प्रधानमंत्री यांच्यासह संरक्षण मंत्री मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री आदींच्या उपस्थिती केले होते. मात्र हा पुतळा पडला ही घटना दुर्दैवी आहे. यात भ्रष्टाचार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे राज्यातील मराठी माणसाला मोठे दुःख झाले आहे. उल्लेखनीय म्हणजे तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते १९६७ साली प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवला आहे. तो पुतळा आजही ताठ मानेने उभा आहे. काही लोकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावे राजकारण केले, सत्ता हस्तगत केली. मात्र याच लोकांकडून छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान झाला आहे. या भ्रष्टाचारी सरकारला राज्यपालाने बरखास्त करून मालवणीतील घटनेची सखोल चौकशी करावी. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे. या निवेदनावर संजय पवार राजेंद्र तळीखेडे, सुधीर गाडे, विजय माने, दिलीप पवार, विशाल माने, सिद्धेश्र्वर केशव शेट्टी, बाळू माशाळे, बाबा सांगवे, प्रतीक कोथिंबिरे, नागेश पात्रे, किशोर शिंदे, मुकेश गायकवाड, अमर याटे, प्रदीप सपसाळे, युवराज सुर्यवंशी, संगीता सलगर, लक्ष्मी गंगावणे, पार्वती फुले, प्रदीप जाधव, सुरेश पवार, किशोर बिराजदार, दीपक राठोड, प्रशांत कवठे, सचिन सगर, अतुल पवार, प्रताप तपसाळे, सागर सोनवणे, रमेश जोगे आदींच्या सह्या आहेत.

# ४० शाळांना २ लाख ४० हजाराची दुर्मिळ पुस्तके मोफत वाटप

धाराशिव दि.२९ (प्रतिनिधी) – युनिक फिचर्स व समकालीन प्रकाशन पुणे यांच्या सहकार्यातून तसेच देणगीदार, हरिविजय गुर्जर, डॉ कल्याणी मांडके व डॉ हेमंत वाकणकर या देणगीदारांच्या मदतीने धाराशिव तालुक्यातील तेरणानगर बिट व तुळजापूर तालुक्यातील अपसिंगा केंद्रातील एकूण ४० शाळांना प्रत्येकी ६ हजार प्रमाणे २ लाख ४० हजार रुपयांची पुस्तके दि.२९ ऑगस्ट रोजी गट शिक्षणाधिकारी कार्यालय धाराशिव येथे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ९३ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलणाचे स्वागतध्यक्ष नितीन तावडे तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी दैवशाला हाके, कांबळे, केंद्रप्रमुख जगदीश जागते, निलेश नागले, श्याम खुणे, संजय तानवडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक बशीर तांबोळी यांनी तर सूत्रसंचालन एस. आर. चव्हाण यांनी व आभार निलेश नागले यांनी मानले. वाचन संस्कृती वाढली पाहिजे व जपली पाहिजे असे सांगितले. या कार्यक्रमासाठी तिन्ही केंद्रातील ४० मुख्याध्यापकांसह तानाजी वनकलस, महेंद्र रणदिवे व शिक्षक उपस्थित होते.

# कसं आहे ना?

एक कागदाचं  
पान असतं...!!  
'श्री' लिहलं, की  
पूजलं जातं ...  
प्रेमाचे चार शब्द लिहले,  
की जपलं जातं...  
काही चुकीचं आढळलं, की  
फाडलं जातं...  
एक कागदाचं  
पान असतं...!!  
कधी त्याला विमान बनवून  
भिरकावलं जातं...  
कधी होडी बनवून  
पाण्यात सोडलं जातं...  
कधी भिरभिरं बनवून  
वाऱ्यावर फिरवलं जातं...  
आणि कधी तर  
निरुपयोगी म्हणून  
चुरगाळलंही जातं...  
एक कागदाचं  
पान असतं....!!  
जे लेखकाच्या  
लेखणीला हात देतं...  
जे चित्रकाराच्या  
चित्राला साथ देतं...  
जे व्यापाऱ्याच्या  
हिशोबाला ज्ञात ठेवतं...  
आणि हो,  
वकीलासोबत कोर्टात गेलं,  
की साक्षही देतं...  
एक कागदाचं  
पान असतं.....!!  
पेपरवेट ठेवलं, की  
एकदम गप्प बसतं...  
काढून घेतलं, की  
स्वच्छंदी फिरतं  
आणि  
कशांत अडकलं, तर  
फडफडायला लागतं...  
एक कागदाचं  
पान असतं.....!!  
ज्यावर  
बातम्या छापल्या, कि  
वर्तमानपत्र बनतं...  
प्रश्न छापले, कि  
प्रश्नपत्रिका बनतं...  
विवाहाचं निमंत्रण छापलं,  
की लग्नपत्रिका बनतं...  
तर कधी आदेशसंदेश  
लिहले, की तेच टपालही  
बनतं...  
एक कागदाचं  
पान असतं....!!  
माणसाच्या जीवनांत  
आणि त्यांत खूप  
साम्य असतं...!!  
एक कागदाचं  
पान असतं...!!  
जन्माला आला तर Birth  
certificate असतं  
निधन झालं तर Death  
certificate असतं  
एक कागदाचं  
पान असतं...

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात शनिवारी एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयात इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संयुक्त विद्यमाने येत्या शनिवारी, ३१ ऑगस्ट रोजी लिव्हरेजिंग इंडियाज डेमोग्राफिक डिव्हिडंट फॉर अ सेल्फ रिलायन्स अँड सस्टेनेबल फ्युचर बाय २०४७ या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्राचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते होणार आहे.

या चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, उपाध्यक्ष ललितभाई शाह, उपाध्यक्ष रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, कोषाध्यक्ष संजय बोरा आदींची उपस्थिती असणार आहे. या चर्चासत्रात गुलबर्गा विद्यापीठातील रजिस्ट्रार डॉ.लक्ष्मण राजनाळकर, हैदराबादच्या टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सचे डेप्युटी डायरेक्टर प्रोफेसर असीम प्रकाश, नवी दिल्लीच्या श्रीराम महाविद्यालयाचे सहयोगी प्रा.डॉ. सूर्या प्रकाश, नांदेड विद्यापीठाचे परीक्षा विभागाचे प्रभारी संचालक डॉ. डी.एम. खंदारे हे साधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. या चर्चासत्रात देशभरातून अनेक प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थी सहभागी होणार असून, हे चर्चासत्र ३१ ऑगस्ट रोजी दिवसभर दयानंद शिक्षण संस्थेच्या सभागृहात संपन्न होईल. या चर्चासत्रात जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बालाजी कळंबे आदींनी केले आहे.

# लोकसभा सार्वत्रिक निवडणूकित राष्ट्रीय सेवा योजणेने एक नवा पॅटर्न निर्माण केला



लातूर / प्रतिनिधी- लातूर शहराने उद्योग आणि शिक्षण क्षेत्रामध्ये आपल्या कार्यकुशलतेने नावलौकिक मिळविला आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना +२ या विभागातील स्वयंसेवकांनी एक वेगळा पॅटर्न निर्माण केला, असे गौरव उद्गार उपजिल्हाधिकारी प्रियांका आयरे यांनी व्यक्त केले

महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेद्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर द्वारा आयोजित राष्ट्रीय सेवा योजना +२ लोकसभा निवडणूक-२०२४ स्वयंसेवक प्रमाणपत्र वितरण व राष्ट्रीय सेवा योजना परिचय कार्यक्रमात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयक प्रा. डॉ. संदिपान जगदाळे, जिल्हा समन्वयक प्रा. विजय गवळी, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रा. भाग्यश्री पाटील, रूपाली देशमुख, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. डॉ. शिवप्रसाद डोंगरे इत्यादींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्रियांका आयरे म्हणाल्या की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यावर संस्कार घडविले जातात व राष्ट्रीय सेवा योजना ही माणूस बनवण्याचे काम करत असते. मी रासेयो मध्ये स्वयंसेवक असताना २७ दिवसाच्या कॅम्प मध्ये सहभागी होऊन काम केले आहे.

याप्रसंगी विभागीय समन्वयक प्रा. डॉ. संदीप जगदाळे बोलताना म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विविध कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सणांचे आयोजन करण्यात यावे व या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व्हावे व त्यातून विद्यार्थी सक्षम घडावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या निमित्ताने बोलताना जिल्हा समन्वयक प्रा. विजय गवळी म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीदवाक्य नॉट मी बट यु अशा पद्धतीचे आहे. या ब्रीद वाक्याप्रमाणे राष्ट्राची सेवा करण्यासाठी स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी सतत प्रयत्नशील असले पाहिजे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने मंचावर उपस्थित प्रा भाग्यश्री पाटील म्हणाल्या की, मी याच महाविद्यालयाची विद्यार्थिनी असून मला या महाविद्यालयाने संस्कार दिले त्यातून मी घडले आणि आजच्या कार्यक्रमामध्ये मला सहभागी होत आले त्याबद्दल मला स्वतः ला भाग्यवान समजते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रत्नाकर बेडगे यानी केले तर अध्यक्षीय समारोप प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यानी केला. यावेळी प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा. देविदास वसावे, प्रा. शैलेश कानडे, प्रा. मीनाक्षी नीला, प्रा. वैशाली जयशेटे, प्रा. व्यंकट दुडिले, प्रा. दयानंद टेंकाळे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे उपस्थित होते. त्यांना मान्यवराच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किसनाथ कुडके यांनी केले तर आभार प्रा. डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बालाजी डावकरे, कृष्णा कोळी, संतोष येंचवाड, संगमेश्वर मुळे, शिवशंकर खुब्बा, गुरुप्रसाद बिराजदार यांनी प्रयत्न केले.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-प्रा.बी.व्ही.मोतीपवळे, संपादक - डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# शक्ती कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी स्वाक्षरी मोहीम



धाराशिव दि.२९ (प्रतिनिधी) – राज्यात बालिका मुली व महिला यांच्यावर गाव खेड्यापासून महानगरीय शहरापर्यंत अतोनात छेडछाड, बलात्कार व अत्याचार होत आहेत. मात्र याला आवर घालण्यासाठी सरकार कुठलीच भूमिका घेत नाही. आघाडी सरकारच्या काळात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महिलांच्या सुरक्षेसाठी खास शक्ती कायदा केलेला आहे. मात्र त्याची अंमलबजावणी अद्याप पर्यंत केली नसल्यामुळे नराधमांचे मनोधैर्य वाढवून ते महिलांवर अत्याचार करीत सुटले आहेत. त्यामुळे तात्काळ शक्ती कायद्याची अंमलबजावणी करावी यासाठी जनजागृती व्हावी म्हणून शिवसेना (ठाकरे) युवती आघाडीच्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनींची स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे. धाराशिव येथील आर.पी. कॉलेज येथे ही मोहीम आ कैलास पाटील, जिल्हा संपर्कप्रमुख मकरंद राजेनिंबाळकर, शंकर बोरकर, युवती सेनेच्या लोकसभा विस्तारक स्वाती बोरकर यांच्या हस्ते यांच्या उपस्थितीत प्रारंभ दि.२९ ऑगस्ट रोजी करण्यात आला. दरम्यान, यावेळी महाविद्यालयीन युवक व युवतींनी सह्या केल्या.

बदलापूर येथे बालिकेवर अत्याचार करण्यात आला तर पुण्यामध्ये देखील त्या पाठोपाठ असाच प्रकार पहिले बाबत घडला आहे. तसेच धाराशिव जिल्ह्यातील राज्याच्या विविध भागात बालिका मुली व महिलावर सातत्याने बलात्कार व अत्याचार मोठ्या प्रमाणात केले जात आहेत. याला आळा घालण्यासाठी महाआघाडी सरकारच्या काळात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महिला सुरक्षेसाठी तयार केलेला सुरक्षा कायदा लागू करावा अशी मागणी केली आहे. कारण या कायद्यामध्ये १६ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलीवर अत्याचार करणाऱ्यास मरेपर्यंत जन्मठेप, बलात्कार प्रकरणी अजामीनपात्र गुन्हा, दुर्मिळात दुर्मिळ प्रकरणात फाशीच्या शिक्षेची तरतूद, ओळखीतल्या व्यक्तीने बलात्कार केल्यास जन्मठेप किंवा मरेपर्यंत जन्मठेप आणि दंड, सामूहिक बलात्कार करणाऱ्यांना वीस वर्षे कठोर जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद किंवा करण्यात आलेली आहे. मात्र या कायद्याची अंमलबजावणी महायुती सरकारने अद्यापपर्यंत केलेली नाही. त्यामुळे त्या कायद्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी या मागणीसाठी ही मोहीम राबविण्यात आली. यावेळी आमदार कैलास दादा पाटील शिवसेना सहसंपर्कप्रमुख शंकरराव बोरकर, शिवसेना सहसंपर्कप्रमुख माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर, युवासेना जिल्हाप्रमुख अक्षय ढोबळे, शिवसेना शहरप्रमुख सोमनाथ गुरव, उपजिल्हाप्रमुख विजय सस्ते, युवती सहसचिव मनिषा वाघमारे, जिल्हा समन्वयक अँड संजय भोरे, युवासेना उपजिल्हाप्रमुख राणा बनसोडे, कालेज कक्ष प्रमुख ऋअविनाश शेरखाने, युवासेना जिल्हा सचिव शिवयोगी चपणे, उपशहरप्रमुख सुरेश गवळी, युवासेना जिल्हा सहसचिव अजय धोंगडे, रवि कोरे आळणीकर देवानंद एडके, मधूकर बोंदर, अश्विन लिंगे आदीसह शिवसैनिक उपस्थित होते. या मोहिमेस महाविद्यालय विद्यार्थी विद्यार्थिनींनी मोठा प्रतिसाद दिला. या सह्यांचे निवेदन राष्ट्रपतींना देण्यात येणार आहे.

## शिक्षण विस्तार अधिकारी संघटनेच्या अध्यक्षपदी फुलारी तर सचिव जंगम

धाराशिव दि.२९ (प्रतिनिधी) – जिल्हा विस्तार अधिकारी संघटनेच्या अध्यक्षपदी सुशील फुलारी यांची तर सचिवपदी दत्तप्रसाद जंगम यांची व कार्याध्यक्ष म्हणून येडशी बीटचे प्रकाश पारवे, महिला प्रतिनिधी म्हणून गट शिक्षण कार्यालयातील दैवशाला हाके, कोषाध्यक्षपदी बावी बीटचे चंद्रकांत चिलवंते यांची निवड करण्यात आली आहे.

तुळजापूर तालुक्यातून क्राक्रंबा बीटचे मल्लिनाथ काळे, उमरगा गट शिक्षण कार्यालयातील काकासाहेब साळूंके, परंडा तालुक्यातील पिंपळवाडी बीटचे अशोक खुळे, कळंब तालुक्यातील येरमाळा बीटचे संतोष माळी, वाशी तालुक्यातील पारगाव बीटचे सुधाकर कोल्हे, लोहारा तालुक्यातील आष्टा कासार बीटचे देविदास मुळजे, भूम तालुक्यातील भुम बीटचे सोमनाथ टकले तर धाराशिव तालुक्यातील रुईभर बीटच्या जयमाला शिंदे यांना संधी मिळाली आहे. यावेळी पीठासीन अधिकारी म्हणून मंगरुळ बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी मल्हारी माने यांनी तर सूचक म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी राहुल भट्टी, तात्यासाहेब माळी तर अनुमोदक म्हणून मधुकर तोडकर व दैवशाला हाके यांनी काम पाहिले.

## सार्थक जीवन

सुख व धर्माची स्थापना करणेच मानवी जीवनाचे लक्ष्य आहे. ईश्वराने जी शक्ती व पात्रता मानवाला दिली आहे तिचा सदुपयोग दुसऱ्यांची मदत करणे, त्याचे जीवन सुखी करण्यात आहे. शारीरिक गरजांची पुर्तता करण्यासाठी मेहनत आवश्यक आहे. जीवनातील अडचणी सोडवून जो वेळ व शक्ती मिळते त्यास विश्वकल्याणात खर्च केले पाहिजे कारण हेच सर्व शास्त्रांचे सार आहे–श्अष्टादश पुराणेषु व्यासस्य वचनं द्वयम, परोपकाराय पुण्याय पापाय पर पीडनम्श। तात्पर्य म्हणजे मनुष्य जीवनाचा उद्देश परोपकार व पुण्यच आहे. जो मनुष्य जीवनात येऊन आपली विचारसरणी व भावनांना शुष्कता, नीरसता व कठोरता सारख्या दोषातून मुक्त होऊ शकला नाही तो जीवनाच्या वास्तविक रसग्रहण करण्यापासून वंचितच राहिल. आनंदाचा स्त्रोत चांगल्या अनुभवांमध्ये आहे. भक्ती–प्रेम–समर्पण व सत्योपासनाद्वारे ईश्वर प्राप्त करणे शक्य आहे. ज्यांचे अंत:करण शुद्ध आहे, जे भावनांना मनात स्थान देत नाही त्यांना ईश्वर प्राप्ती सहज होते. मानवी जीवनाचा बहुतांशी भाग आहार, निद्रा, भय इत्यादीत जातो. शारीरिक गरजा पुर्ण करण्यात बराच वेळ व शक्ती खर्च होते. एवढ्याच गोष्टी व्यस्त राहणे मानवी जीवनाचे लक्ष्य है? सृष्टीतील सर्व जीवांमध्ये सर्वश्रेष्ठ असल्यामुळे मानवाचे उत्तरदायित्व सुद्धा श्रेष्ठ आहे. जो आपल्या कर्तव्याकडे लक्ष देत नाही तो नक्कीच मनुष्यत्वाचा महान गौरव प्राप्त करण्याचा अधिकारी नाही. अमाप पैसा किंवा भौतिक सुख मिळवूनही जीवन खरेदी केले जाऊ शकत नाही. सद्भावच म ानवाची सत्य व स्थायी संपत्ती आहे म्हणून जीवनाच्या प्रत्येक क्षणाला सदगुण–संपादनातच खर्च करणे बुद्धिमत्ता आहे. मानवी जीवनास यशस्वी बनवणेच खरी दुरदृष्टीता आहे.

## राशी भविष्य



**मेष :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर
जुन्या परिचित व्यक्तिची अचानक भेट होईल. मनोबलात वाढ होईल. आर्थिक स्थिती चांगली राहील. कामकाजाची परिस्थिती चांगली राहील. घरासंबंधातील समस्या निर्माण होऊ शकते.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व
मित्रांचे सहकार्य लाभेल. विचारपूर्वक काम केल्याने कामात यश मिळणार आहे. साथीदारांच्या कामावर लक्ष असू द्या. शिक्षणा संबंधीतील कामात यश मिळेल.

**मिथुन :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण
सामाजिक कामात यश व सन्मान मिळण्याचे योग आहे. परिश्रमाचा पूर्ण मोबदला मिळेल. उत्पन्नात वाढ होईल. खाण्या:पिण्यावर लक्ष असू द्या. रोजगारात प्रगती राहील.

**कर्क :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर
कौटुंबिक सदस्याचे आपल्या विषयी मत चांगले राहील. काम करतांना वेळेचे बंधन राखा. आर्थिक गुंतवणूक विचारपूर्वक करा. रागावर नियंत्रण राखणे गरजेच आहे.

**सिंह :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा:उत्तर
मनमानीने काम करण्याची प्रवृत्तीमुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक स्थिती खराब राहील. कुटुंबातील सदस्यांच्या प्रकृतीची काळजी घ्या.

**कन्या :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर
पूर्वी केलेल्या कामाचा चांगला परिणाम दिसेल. मुलांच्या बाबतीत भावनीक समस्या निर्माण होतील. व्यापारात नवीन योजना आखाल त्या फायदेशीर असतील.

तुळ : शुभ रंग :पिवळा, शुभ दिशा: दक्षिण
मागील स्मृती उजाळल्यामुळे दु:ख होईळ. धार्मिक प्रवृत्तीत वाढ होईल. उच्च अधिकाऱ्यांच्या भेटी होती. काम चुकारपणा करू नका.

**वृश्चिक :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:दक्षिण
कामात यश मिळाल्याने आनंदी रहाल. प्रवास फायदेशीर असणार आहे. नातेवाईकांशी असलेल्या संबंधावर मर्यादा राखा. कायदेशीर बाबी पूर्ण करा.

**धनु :** शुभ रंग: काळा, शुभ दिशा: पूर्व
जोशपूर्वक कामात रस घ्याल. हुशार व्यक्तिची भेट होईल त्यामुळे फायदा होईल. कौटुंबिक समाधान लाभल्यामुळे मन प्रसन्न राहील. आपल्या वस्तू संभाळा.

**मकर :** शुभ रंग: लाल : शुभ दिशा: पूर्व
विशेष काम होण्याचे योग आहेत. साथीदाराचे सहकार्यामुळे मन प्रसन्न राहील. वहान चालवताना सावधानी बाळगा. शारिरीक कामात वाढ करण्याकरिता प्रयत्न करा.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पूर्व
शुभकामाची रूपरेषा आखाल. राजकीय कामात यश मिळण्याचे योग आहेत. जास्त फायदा मिळण्याच्या दृष्टीने केलेले प्रयत्न फायदेशीर राहतील. दुसऱ्याच्या बोलण्यावर विश्वास दाखवू नका.

**मीन :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व
कामकाजात आलेली समस्या आपल्या प्रयत्नामुळे दूर होईल. बाहेरील व्यत्तिंफ्च्या कामकाजावर विशेष लक्ष द्या. यश मिळाल्याने उत्साह वाढेल. व्यापार व्यवसाय फायदेशीर राहील. महत्वकांक्षा पूर्ण होतील.

## ३० ऑगस्टला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

तुमच्या जन्मतारखेवर मंगळ, नेपच्यून व त्यानंतर सुर्याचा अधिकाधिक प्रभाव आहे. तुमचे निर्णय तुम्ही साधकबाधक विचार करीत बसण्यापेक्षा अंत:स्फूर्तीने घेता. भविष्याची स्वप्ने रंगवायला तुम्हाला आवडते. तुमच्याकडे प्रचंड आत्मविश्वास असतो. कुठल्याही प्रकारचा संकुचितपणा तुम्हाला आवडत नाही. भ्रष्टाचाराविषयी तुम्हाला प्रचंड चीड असते. त्याविरूध्द उभारलेल्या आंदोलनात तुम्ही आघाडीवर असता. नेतृत्वाचे गुण तुमच्या अंगी जन्मजात असतात. संकटकाळातही तुमचे मनोबल कमी होत नाही. कोणत्याही अडथळ्यावर मात करून ध्येयांच्या दिशेने वाटचाल करता. भावनेच्या भरात निर्णय घेणे तुम्ही टाळायला हवे. व्यक्तिंगत स्वार्थापेक्षा इतरांची दुःखे दूर करण्यासाठी केलेली आंदोलने यशस्वी ठरतील. नीतिमूल्ये प्रत्यक्षात आणताना पाय जमिनीवर पक्के ठेवा. अतिश्रम टाळायला हवेत. क्रोधालाही आवर घालायला शिका. नाहीतर उच्च रक्तदाब, हृदयविकारासारखी दुखणी उद्भवतील. कार्यक्षेत्र : प्रशासकीय कौशल्य व सुजाण व्यवस्थापनाचे कसब या तुमच्या जमेच्या बाजू आहेत. लोकसेवा आयोगाच्या परीक्षाद्वारे शासनाची पोलिस, संरक्षणदल किंवा प्रशासकीय खात्यात तुम्हाला चटकन प्रवेश मिळू शकेल. आपल्या साहसी वृत्तीने तेथे तुम्ही झपाट्याने प्रगती करून घ्याल. राजकीय क्षेत्रात तुमचा नावलौकीक लवकर होईल. सक्रीय राजकारणात भाग घ्या. वैद्यकिय क्षेत्र, डोळ्यांचे दवाखाने, छायाचित्रण, रत्नांचे व्यापार ही क्षेत्रेही अनुकूल आहेत. प्रणयी जीवन : तुमचा जोडीदार तुमच्या सारखाच सामाजिक बांधिलकी असलेला असावा अशी तुमची अपेक्षा असते. तुमचा स्वभाव दिलदार असल्याने खोट्या मनोवृत्तीच्या, कंजूष स्वभावाच्या व्यक्ती तुम्हाला पसंत पडत नाहीत. तुमच्या प्रेमळ स्वभावाला जोडीदारानेही तितकाच उत्कट प्रतिसाद द्यावा अशी तुमची अपेक्षा असते. जानेवारी २० ते फेब्रुवारी १८ दरम्यानच्या ६, १५, २४ तारखेच्या व्यक्तींकडून ही अपेक्षा पुर्ण होईल.

वर्षफळ : वर्षभर आर्थिक परिस्थिती उत्तम राहील. व्यावसायीक प्रगती थोड्या मंद गतीने आली तरी स्थायी स्वरूपाची राहील. पोलाद, रसायने यांच्या कंपन्यात केलेल्या गुंतवणूकीतून लाभ होत राहतील. मार्च–एप्रिल मध्ये वडिलार्जित इस्टेटीतून लाभ होतील. मे–जुन मध्ये भरपूर प्रवास, नवे परिचय यामुळे अनुभविश्व संपन्न होईल. उत्पादनांच्या एजन्शी मिळतील. जुलै–ऑगस्ट मध्ये प्रीतीला प्रतिसाद मिळेल. नोव्हेंबर मध्ये अधिकार पद चालून येईल डिसेंबर मध्ये सभा, सम्मलने, परिषदा वकृत्वाने गाजवाल.


महत्वाचे वर्ष : १, १०, १९, २८, ३७, ४६, ५५, ६४, ७३, ८२, ९१.

भाग्यरत्न : माणिक

याच तारखेची व्यक्ती : छत्रपति शिवाजी महाराज, अरविंद गोखले, बळवंतराय मेहता

## उपदेशकथा

स्वामी विवेकानंदांच्या मनात भारताविषयी अतोनात भक्ती होती. या देशाच्या उद्धाराचा विचार सदैव त्यांच्या अंत:करणात चालू असे. अमेरिका आणि अन्य पाश्चात्य देशांचा दौरा आटोपून स्वामीजी पुन्हा भारतात यावयास निघाले तेव्हा एका ब्रिटिश मित्राने त्यांना विचारले, आपण गेली चार वर्षे पाश्चात्य जगातली ऐश्वर्यसंपन्न, नेत्रदीपक, शक्तीमान असं आयुष्य अनुभवलं. आता आपल्याला भारतात परत जाताना कसं वाटतं? स्वामीजी म्हणाले, मी येण्यापूर्वी भारतावर माझं खूप प्रेम होतं आता तर भारतातील धुळीचाही प्रत्येक कण, तिथली हवा मला पवित्र वाटत आहे. ती भूमी आता अधिकच पवित्र वाटत आहे.' संन्याशाला असे एखाद्या विशिष्ट देशाविषयी ममत्व का वाटावे? असा प्रश्न त्यांच्या ब्रिटिश मित्राने विचारला असता स्वामीजी म्हणाले की, 'जो स्वदेशावर प्रेम करू शकत नाही, तो विश्व कसे कवेत घेणार? आधी देशप्रेम नि मगच विश्वबंधुत्व! कथा उपदेश : जो आपल्या मायदेशावर प्रेम करतो. त्यालाच विश्वबंधुत्व साध्य होते.




### देशप्रेम

## अशी घ्या त्वचेची काळजी

माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची परीक्षा करणार्?या ज्या अनेक बाबी आहेत, त्यात त्वचेचाही समावेश होतो. म्हणजे एखाद्या माणसाची उंची, जाडी, ही जशी त्याची ओळख असते, तशीच त्वचा हीही माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग असते. म्हणजे एखाद्या मुलीची सतेज त्वचा चटकन लोकांचे लक्ष आकर्षून घेण्यास कारण ठरते व हेच त्वचेवर कही डाग असतील, कांही त्वचारोग असेल तरीही लोकांचे लक्ष वेधले जातेच. या त्वचेची काळजी घेणे सर्वच वयोगटातील लोकांसाठी उपयुक्त ठरत असते. जाहिरातींतूनही मुख्यत्वे गोरेपण देणार्?या क्रिमच्या जाहिराती सर्वाधिक प्रमाणात येतात ते त्यामुळेच. त्वचेची निगा राखण्याचे तसेच काही व्याधी असल्यास त्या दूर करण्याचे हे कांही सोपे उपाय–१)अंगाला कंड सुटणे – हा गंभीर रोग नसला तरी चार लोकांत अंग खाजविणे हे कांही चांगले लक्षण नसते. काही विशिष्ट रोगांमुळे अथवा अथवा अन्य विशिष्ट कारणाने अंगाला खाज असेल तर कोथिबीरीचा रस अंगाला चोळून अर्ध्या तासाने आंघोळ केल्यास कंड कमी होते.२) त्वचा सतेज राहण्यासाठी– साबणाच्या वापराऐवजी हिरवे मूग सालासकट बारीक दळून आणावेत व हे पीठ दुधात अथवा पाण्यात कालवून आंघोळीच्या वेळी अंगाला लावावे. बाराही महिने हे वापरता येते. हिरवे मूग हे उत्तम त्वचा राखणारे किवा स्कीन टोनर आहेत.३) चेहर्?याची त्वचा उजळणे– जायफळ दुधात उगाळून तो लेप दिवसाआड चेहर्?यावर लावावा. वाळल्यावर चेहरा धुवावा. आठ दिवसात त्वचा उजळल्याचे दिसेल.४) मुरमे, पुटकुळ्या, काळे डाग – यावरही दिवसाआड जायफळ दुधात उगाळून त्याचा पातळ लेप चेहर्?यावर लावावा वाळल्यावर चेहरा धुवावा.५) तेलकट त्वचा– बर्?याच जणांना वारंवार चेहरा धुवूनही त्वचेत तेलकटपणा जास्त असल्याने चेहरा तेलकट दिसण्याचा त्रास जाणवतो, अशा वेळी नागरमोथा पावडर पाण्यात कालवून आंघोळीच्या आधी सर्व अंगाला लावावी व अर्ध्या तासाने आंघोळ करावी. केवळ चेहर्?यावरही हा लेप लावता येईल. हा उपचार आठवडयातून दोनच वेळा करावा.६) कोरडी त्वचा – तेलगट त्वचेविरूद्द म्हणजेच कोरडी त्वचा असण्याचा त्रासही बर्?याच जणांना जाणवतो. कोरडी त्वचा निस्तेज दिसते. यावर उपाय म्हणून आठवडयातून दोन वेळा खोबरेल तेल व साजूक तूप एकत्र करून अंगाला चोळून लावणे उपयुक्त ठरते. खोबरेल तेल व साजूक तूपाचे हे मिश्रण नैसर्गिक मॉइश्चरायझरचे काम करते. या मिश्रणाने त्वचेवर जे आवरण तयार होते, त्यामुळे त्वचेखालील आर्द्रता आपोआप राखली जाते आणि त्वचेचा कोरडेपणा कमी होतो



## श्रीसिद्धान्तशिखामणी -अमृतधारा




### शिक्षापादोदकस्थल

दृष्टे तस्मिन् परानन्दे
देशकालादिवर्जिते।
द्रष्टव्यं विद्यते नान्यच्छ्रोतव्यं
ज्ञेयमेव वा।।१५।।

भावार्थ : देशकालादिपासून खंडित न होणाऱ्या त्या परमानंदाचा साक्षात्कार झाल्यावर या जगामध्ये पाहण्यासारखे, ऐकण्यासारखे आणि जाणण्यासारखेही दुसरे काही नसते.।।१५।।

## मनोरंजक महाशब्दकोडे




**आडवे शब्द**
१. शिवाजीराजांचे जन्मस्थान
५. पातळसर
९. बातमी
११. घाव
१२. एकरूपता
१५. जमीनजुमला
१८. खेळात एकाच नाण्याच्या दोन बाजू
२०. यज्ञ
२१. वेदनेची तिडीक
२२. नवरा
२५. कापडाचा गठ्ठा, ठिकाण
२६. मासा
२७. रिकामपणाचा उद्योग?
२८. एक मंगलवाद्य
३०. दिवाळीतील कुबेरपूजनाचा दिवस
३१. मनाची बोचणी
३२. पांढुरका रंग
३४. ध्यानात या क्रियेवर लक्ष केंद्रित करावे
३६. तीरकमान नसलेला तरी नेमबाजीचा देशी खेळ
३७. हिंदुस्तान
३८. शिकार
३९. विपुलता, रेलचेल
४१. हिस्सा
४२. दागिना, वाद्य
४३. मोठे गाव
४५. दृष्टी
४७. नवीन
४८. वटवट, त्रास
५०. तरुण
५२. बाजेची चपटी कापडी पट्टी
५४. अवघड
५५. दारू
५६. गायकाचा साथीदार, साजिंदा
५८. प्रचंड, खूप
५९. अपचनाची आंबट ढेकर
६१. वृद्धत्व
६३. मालक
६४. --- घडण
६५. ताकद
६६. मला
६९. लाज
७१. मलई
७२. देवाणघेवाण
७४. मळभ
७५. खटला
७७. चामखीळ
७८. आक्रोश
७९. खळबळजनक
८०. आतापर्यंत
८२. नशीब
८३. मुळापर्यंत जाणारा इंग्रजी रस्ता?
८४. फूल

**उभे शब्द**
१. महादेवाचे मंदिर
२. आशीर्वाद
३. अस्वल
४. वजन
५. एक तारवाद्य
६. नवऱ्याची दुसरी पत्नी
७. पद्धत
८. सर्वस्व
९. रस्त्यात डांबरासह भरण्याचे बारीक दगड
१०. कंटाळवाणे
१३. शूर
१४. चंदन उगाळण्याचा दगड
१६. जाड दोरी
१७. लोकनाट्य
१९. पाणी
२१. कडक, निर्मम
२३. तीव्र रेचक
२४. मुस्लीम प्रार्थना पद्धत
२५. ठाण्याचा नागरिक
२८. एकटा
२९. परमेश्वर
३०अ. प्रज्वलित (झाला)
३१. स्त्रियांच्या पंजाबी पोशाखातील तीन वस्त्रे
३३. रत्न
३५. श्रीमंत
३७. भागण्याची संख्या
३८. कबूतर
३९. संगीतातील एक राग
३९अ. प्रतिष्ठा
४०. चटकन
४२. फणसाची पोळी
४४. हत्ती
४६. वडील
४८. बारीक ताप
४९. सहा आसनी रिक्षा, घोडागाडी
५१. 'जुना'च्या विरुद्ध
५३. चंद्र, ओशोंचे पहिले नाव
५७. श्वासरोग
६०. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
६२. मनाचे ेक लिहिणारे
६७. लोक, प्रजा
६८. भीमाचे शस्त्र
७०. रमापती, श्रीविष्णू
७२. फोडणीचे वरण
७३. नागरिक७६. गाईचे पिल्लू
७८. कमाई, मिळकत
७९. वर्ष, साल
७९अ. अपशकुन
८०. सर्वसामान्य

॥ हे प्रभो प्रसिद ओम्॥

# महातपस्वी तपोवन निवासी स्वामी श्री. श्री. कुमारेशच्या ११५ व्या जन्म जयंती उत्सवानिमित्त कोटी कोटी वंदन



ईश्वराच्या महान कृपेमुळेच मनुष्यजन्म, मोक्षाची इच्छा आणि सत्पुरुषांचा सत्संग लाभतो. भारताच्या उत्तरेकडील हिमालय पर्वत रांगेतील अत्यंत उंच अशा पर्वतांत चार आश्रम आहेत. अनुक्रमे ते असे होत १) निळचंद्रगिरी आश्रम, २) संभाला, ३) सुमेरू आणि ४) ज्ञानगंज आश्रम. यांतील ज्ञानगंज आश्रमात हजारो वर्ष वय असलेल्या अनेक योगींचा वास्तव्य आहे. त्यांमध्ये प. पू. स्वामी निमानंदजी परमहंस हे एक सिद्ध पुरुष आहेत सोबतच ते पू. श्री क्षेमानंद (कुमारेशाचे पूर्वजन्मीचे नाव) या साधकाचे गुरु होत यासोबतच योगी पू. श्री विशुद्धानंद उर्फ गंधबाबा जे की क्षेमानंदाचे ज्येष्ठ गुरुबंधू आहेत या दोघांचे सानिध्य क्षेमानंदास लाभले.ज्ञानगंज आश्रमात ते मयोगशास्त्र व विज्ञानफ या विषयाचे अतिशय हुशार साधक होते.

आपले गुरु व गुरुबंधू यांच्या खडतर तपश्चर्या करून मानव समाजासाठी विधायक कार्य करण्याच्या आदेशाच्या पालनाकरिता व देशविदेशातील असंख्य भक्तगण, साधकवर्ग आणि समस्याग्रस्तांचे अनेक समस्या आजार व अडचणी दूर करून दवा,दुवा व मार्गदर्शन करण्यासाठी या भारतभूमीवरील कर्नाटक राज्यात मौ. हुणशीकट्टी जि. बेळगांव येथे विसाव्या शतकात म्हणजेच २ ऑगस्ट १९०९ साली राखी पौर्णिमेच्या शुभदिनी सायंकाळच्या प्रकाशात एका तेजस्वी सुंदर अशा बालकाचा पुनर्रजन्म शरणी सौ चीनम्मादेवी व शरण श्री लक्ष्मणजी यांच्या घरी कुमारेश या नावाने झाला.

पूर्वजन्म व पुनर्जन्म ही सतत चालणारी प्रक्रिया आहे आणि हे सत्य आहे. सत्य हे ताकातील लोण्यासारखे असते, त्याला कितीही खाली दाबले तरीही काही वेळाने पृष्ठभागावर येऊन तरंगते. अशा प्रकारे स्वामीजींनी पुनर्जन्म घेऊन बालपणापासूनच योग साधना आणि शालेय अभ्यास पूर्ण केले. या काळातसुद्धा त्यांच्याकडून अनेक चमत्कार घडलेले आहेत. याच कालावधीत त्यांना मपराफ वाणी जागृत झाली. त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण राजाराम कॉलेज, कोल्हापूर व कर्नाटक युनिव्हर्सिटी, धारवाड येथे पूर्ण केले. शिक्षणानंतर त्यांनी अतिशय खडतर तपश्चर्या केली एवढेच नव्हे तर जमिनीपासून काही अंतर उंचीवर राहून साधना पूर्ण केली. यामुळे ते कुमरेशाचे कुमारस्वामी झाले. त्यांच्या सानिध्यात व्हॅटिकन सिटीमधील पू. पोप पॉल, दलाईलामा, डॉ ए. पी. जे अब्दुल कलाम, महातपस्वी सिद्धेश्वर महास्वामिजी, विजापूर तसेच मा. श्री शिवराज पाटील चाकूरकर आणि अनेक जागतिक पातळीवर प्रसिद्ध व्यक्ती तपोवन, धारवाड येथे येऊन गेलेले आहेत. त्यांनी भक्तजनांच्या राहण्यासाठी तपोवन येथे मसूमेरुफ भक्तनिवास तसेच एक भव्य प्रार्थना हॉल आणि एक अद्वितीय अश्या दिव्य देवालयाची निर्मिती केली.

त्यांना होमिओपॅथी औषध शास्त्रात अश्विनी अवॉर्ड मिळालेले आहे. त्यांनी अनेक ग्रंथांची निर्मिती केली आहे त्यापैकी एका ग्रंथास जागतिक सर्वधर्म परिषदेकडून परमधर्मचक्र हा बहुमानदर्शक पारितोषिक प्राप्त झाला आहे. ते आयुष्यभर भक्त, साधक व त्यांच्या समस्या आणि असाध्य अशा आजारावर दवा आणि दुवा देऊन लोकांना समस्यामुक्त केलेले अशा या महान योगीराजास त्यांच्या जन्मजयंती असलेल्या राखीपौर्णिमेच्या मुहू समस्त भक्तांकडून पुनःश्च एकदा कोटी कोटी प्रणाम.

डॉ. विद्याधन कामशेट्टे

# संस्कृत भाषा विश्वशांतीची भाषा

जगामध्ये सर्वात प्राचीन असलेली संस्कृत भाषा सर्व मानवाच्या कल्याणासाठी उपदेश करते. सर्वात प्राचीन असलेले संस्कृत वायमय विश्वाला शांतीचा संदेश देतात.

ओम देव शांती: अंतरिक्षम शांती: पृथ्वी शांती: आप शांती ओषधय: शांती: वनस्पतय: शांती: विश्व देवा शांती: ब्रह्म शांती सर्वम शांती: शांती: एव शांती: सा मा शांती: एधी

या वेदमंत्राद्वारे विश्वामधील सर्व मानवाचे कल्याण हो हो अशी प्रार्थना केली आहे.

वसुधैव कुटुम्बकम हे विश्वची माझे घर संपूर्ण विश्व एक परिवार आहे हा संदेश संस्कृत भाषा सांगते.

सर्वे भवन्तु सुखिन: सर्वे भवन्तु निरामयें
सर्वे भद्राणि पश्चन्तु मा कश्चित दुःखभाग भवेत

या संस्कृत सुभाषितांमध्ये सर्वे हा शब्द अनेक वेळा आलेला आहे सर्वे म्हणजे केवळ भारतीय मानवच नाही तर विश्वातील सर्व मानव सुखी हो निरोगी राहोत चांगल्या गोष्टी पाहोत व जगातील कोणताही व्यक्ती मानव दुःखी नसावा अशी उदार अंतकरणाने विश्वशांतीची प्रार्थना केली आहे .

सं गच्छध्वं सं वंदध्वं सं वो मानांकित जानता।
देवा भागं यथा पूर्वेसं जानानां उपासतें

ऋग्वेदामध्ये आलेला हा मंत्र विश्वातील सर्व मानवांना हा संदेश देतो की सर्वजण प्रेमाने मिळून चला सर्व मानव ज्ञानी हो होत हा संदेश पृथ्वीवरील सर्व मानवा ना देण्यात आलेला आहे.

अयं निज: परो वेति गणना लघुचेतसा।।
उदार चरितानां तु वसुधैव कुटुंबक ।।

या संस्कृत सुभाषितांमध्ये संकुचित विचाराचे लोक कसे असतात व उदार विचाराचे लोक कसे असतात ते सांगण्यात आले आहे संकोचित स्वभावाचे लोक हा माझा आहे तो परका आहे असा विचार करतात परंतु उदार अंतःकरणाचे लोक या संपूर्ण विश्वाला एक परिवार मानतात .

विश्वातील सर्व मानवाच्या प्रगतीमध्येच आपली प्रगती आहे. असा संदेश संस्कृत भाषा आपणाला देते.

यथा प्रकाशयति एक: भान: भुवनमंडल।।
तथा प्रकाशति एक: मानवता गुण।

ज्याप्रमाणे या संपूर्ण विश्वाला सूर्य प्रकाशित करतो . त्याप्रमाणेच मानवता हा गुण सर्व विश्वाला प्रकाशित करतो. अर्थात मानवतारूपी शांतीचा मार्ग दाखवतात.

सबकी उन्नती मे ही अपना उत्कर्ष समजना चाहियें

या संस्कृत दिनानिमित्त आपण सर्वजण अशी प्रतिज्ञा करूया की संस्कृत भाषेचा अभ्यास करून विश्वशांतीसाठी प्रार्थना करूया ओम शांति.

हुरदळे सतनाप्पा बसलीगप्पा
श्यामलाल शिक्षण संस्था उदगीर,
श्यामार्य कन्या विद्यालय उदगीर,
(सह-शिक्षक)

*तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार जळकोट यांचे कार्यालय*
(दंडणीय- विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.२७/०८/२०२४

## जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार संगमेश्वर विठठल मेनकुदळे वय ४३ वर्ष रा. जंगमवाडी (पाटोदा व ता. जळकोट जि. लातुर यांच्या मुलीच्या नामे प्रतिक्षा संगमेश्वर मेनकुदळे यांचा जन्म मौजे जंगमवाडी (पाटोदा बु) ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक. २२/०२/२००६ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील प्रतिक्षा संगमेश्वर मेनकुदळे यांचा जन्म दिनांक २२/०२/२००६ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी प्रतिक्षा संगमेश्वर मेनकुदळे यांचा जन्म दिनांक २२/०२/२००६ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु प्रतिक्षा संगमेश्वर मेनकुदळे यांचा जन्म दिनांक- २२/०२/२००६ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय जंगमवाडी (पाटोदा वु) ता. जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २७/०८/२०२४ रोजी दिले
पुढे नेमलेली तारीख २८/०९/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार जळकोट

## दिनांक २३/०८/२०२४ रोजीच्या दैनिक यशवंत या वृत्तपत्रात सुनिल काशिनाथ पांढरे यांनी दिलेल्या जाहीर नोटीसीचा जाहीर खुलासा

मी सुरेश महादप्पा पांढरे सदर खुलासा सुनिल काशिनाथ पांढरे यांनी दिलेल्या दिनाक २३/०८/२०२४ रोजी दैनिक यशवंत या वृत्तपत्रातील जाहीर नोटीसीचा खुलासा खालील प्रमाणे देत आहे.

सुनिल काशिनाथ पांढरे यांना नोटीस देण्याचा कायदेशीर हक्क प्राप्त होत नाही कारण, नोटीसीमधील नमुद मिळकत सर्वे नं. ३०/२ क्षेत्र २ हे ६४ आर पैकी १ हे ३२ आर ही मिळकत वाटणीने नोटीस देणार यांचे वडील काशिनाथ सिद्रामअप्पा पांढरे याचे नावे आली आहे ते आजमितीस जिवंत असून सदृढ आहेत त्यामुळे नमुद मिळकतीबाबत त्याचे मुलास कोणताही कादयेशीर प्रगटन देण्याचा हक्क प्राप्त होत नाही. महसुल अभिलेखात नोटीस देणार याचे नाव नोंदविले गेले नाही

नमुद मिळकत २ हे ६४ आर ही जमीन मी (खुलासा देणार) यांचे वडील महादप्या सिद्रामअप्पा पांढरे व प्रगटन देणार यांचे वडील काशिनाथ सिद्राम अप्पा पांढरे यानी संयुक्तरित्या खरेदीखत नं. २४६० दिनांक ०४/०७/१९७६ रोजी विकत घेतली असली तरी त्यानंतर दोघात नमुद मिळकतीची विभागणी झाली व दक्षिणेकडील १ हे ३२ आर खुलासा देणार यांचे वडीलास व उत्तरेकडील १ हे ३२ आर काशिनाथ सिद्राअप्पा पांढरे यांना आली जो फेरफार अद्याप कायम आहे.

खुलासा देणार सुरेश पांढरे त्याचा मयत भाऊ राजेश, बहिण ज्योती भ्र. बालाजी बिरादार आई मयत कमलाबाई महादप्पा पांढरे यांचेत त्यांच्या वडीलांच्या मृत्यूपश्चात सयुका मालकीने असलेल्या मिळकतीचे व काशिनाथ सिद्रामअप्पा पांढरे याचे नावे असलेल्या पण, वाटणीने महादप्पा पांढरे यांच्या वारसांना गेलेल्या स्थावर घर मिळकतीबाबत दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर उदगीर येथे वाटणी व ताबा मिळणे बाबत राजेश महादप्पा पांढरे यानी दिवाणी वाद नं.९२/२०११ राजेश विरुरूद सुरेश व इतर दाखल केला ज्यात नमुद है ३२ आर पैकी पुर्वेकडील ६६ आर सुरेश पांढरे यांना व पश्चिमेकडील ६६ आर राजेश पांढरे यांना तडजोड हुकूमनाम्याआधारे वाटणीने दिली ज्यात नमुद १ हे ३२ आर घ्या उत्तरेस काशिनाथ सिद्रामअप्पा पांढरे याची मिळकत असल्याचे व ते स्वतः वादपत्रात प्रतिवादी म्हणून असल्याने प्रस्तुत तडजोडपत्रावर त्यांनी वाचून पाहून समजून घेवून संपूर्ण मजकुर खरा व बरोबर असून तो त्यांना मान्य व कबुल असल्याने सही करून न्यायालयासमोर तडजोड मान्य केली आहे जी अद्याप कायम असून नोटीस देमार अथवा त्याचे वडील नमुद हुकूमनाम्यास तो अमान्य असलेबाबत कोणत्याही न्यायालयात आव्हानीत केले नाही. त्यामुळे नोटीस देणार हा सदरचा हुकूमनामा त्यांचे वडीलास त्यांचा स्वभावाचा गैरफ्रायदा घेवून व दिशाभुल करून सही घेतली असे कथन मा न्यायालयाच्या हुकूमनाम्याचा अनादर व अवमान करण्यासारखा आहे त्याबाबत नोटीस देणार सुनिल काशिनाथ पांढरे यांचेवर कायदेशीर कार्यवाही का दाखल करण्यात येवू नये या बाबतचा लेखी खुलासा सदरचा जाहीर खुलासा प्रसिध्द झालेल्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत मला द्यावा.

नमुद शेत मिळकतीबाबत यापुर्वी काशिनाथ सिद्राअप्पा पांढरे यांनी मामलेदार कोर्ट ॲक्ट कलम ५ अन्वये खुलासा देणार यांचे मिळकतीतून रस्ता मिळणेबाबत मा तहसीलदार उदगीर यांचे न्यायालयात प्रकरण दाखल केले होते ज्यात मंडळ अधिकारी तसेच स्वतः तहसीलदार यांनी जायमोकयाची स्थळपाहणी करून प्रकरण निकाली काढले ज्याविरूध्द त्यांनी उपविभागीय अधिकारी उदगीर यांचे न्यायालयात प्रथम अपिल दाखल केले जो खारीज झाला व तहसीलदार यांचा आदेश कायन करण्यात आला प्रस्तुत अपिलाच्या निकालाविरुध्द अप्पर जिल्हाधिकारी लातूर येथे बेकायदेशीर अपिल अपिलार्थीने दाखल केले असून ते सुनावणीकरीता न्यायप्रविष्ठ आहे.

मी असे नमुद करतो की, माझे नावे असलेल्या नमुद मिळकतीतील ६६ आर इतके क्षेत्र निर्विवाद आहे. त्यामुळे ती मिळकत विक्री योग्य आहे पण भी नमुद मिळकत विक्री बाबतचा अद्याप कोणताही निर्णय घेतला नाही अथया विक्री बाबत कोणासही करार केलेला नाही केवळ नमुद मिळकत वादग्रस्त आहे म्हणून संभ्रम जनतेच्या मनात निर्माण करावा या उद्देशाने नोटीस देणार यांनी प्रस्तुतची नोटीस दिली असून त्यात कोणतेही तथ्य नाही. त्यामुळे सदरची नोटीस बेकायदेशर व चुकीची असल्याने व नोटीस देणार याना अशा पध्दतीने प्रसिध्द करण्याचा कोणताही कायदेशीर हक्क प्राप्त होत नसल्याने त्याबाबत खुलासा वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत दिनांक २३/०८/२०२४ रोजी दिलेली नोटीस जाहीरपणे मागे घ्यावी अन्यथा त्यांचेवर मी कायदेशीर कार्यवाही सक्षम न्यायालयात दाखल करणार आहे ज्याच्या खर्चाची व परिणामाची संपूर्ण जबाबदारी नोटीस देणार सुनिल काशिनाथ पांढरे यांचेवर राहील याची नोंद घ्यावी.

सबब हा जाहीर खुलासा दिला जातो.
दिनांक २८/०८/२०२४

खुलासा देणार
सुरेश महादप्पा पांढरे
रा आनंद नगर नादेड रोड, उदगीर
मो नं. ९४२३६५३८२५

# लालबहादूर शास्त्री विद्यालयात दहीहंडी उत्सव



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त दहीहंडी उत्सव उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किरण नेमट तर प्रमुख पाहुणे राजेश गौतम,आनंदी स्वामी तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, माधव मठवाले,आशा गौतम, विजया गोविंदवाड यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे राजेश गौतम यांनी श्रीकृष्णाच्या आदर्श जीवनाचा वस्तुपाठ विद्यार्थ्यांसमोर मांडला.यानिमित्ताने विद्यार्थिनींनी श्रीकृष्णावर आधारित गीतांवर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या नियोजनात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचा शेवट विद्यार्थ्यांनी व विद्यार्थिनींनी दहीहंडी फफोडून साजरा केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम प्रमुख पंकज देशमुख, शैलेश बुरगे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

*तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार जळकोट यांचे कार्यालय*
(दंडणीय- विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.२१/०८/२०२४

## जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार सोनवणे विनोद अर्जुन वय ४० वर्ष रा. पाटोदा बु ता. जळकोट जि. लातुर यांचा मुलाच्या नामे सोनवणे वैभव विनोद यांचा जन्म मौजे पाटोदा बु ता.जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक ०८/०२/२००७ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील सोनवणे वैभव विनोद यांचा जन्म दिनांक ०८/०२/२००७ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सोनवणे वैभव विनोद यांचा जन्म दिनांक ०८/०२/२००७ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू सोनवणे वैभव विनोद यांचा जन्म दिनांक-०८/०२/२००७ रोजीची नोंद ग्राम पंचायत कार्यालय पाटोदा बु ता. जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २०/०८/२०२४ रोजी दिले
पुढे नेमलेली तारीख २१/०९/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार जळकोट

## जाहिरनामा
## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ११४/२०२४ निशाणी क्र.

अर्जदार सलिम पि. निजामोद्दीन उंटवाले, रा. देवणी जि.लातूर व इतर ज्यापेक्षा अर्जदाराचे वडील नामे निजामोद्दीन सय्यदअली उंटवाले हे दिनांक १३/०९/२०२१ रोजी मौजे देवणी ता.देवणी जि.लातूर या ठिकाणी मयत झाले असून ते मौजे देवणी ता.देवणी जि.लातूर येथील रहिवाशी होते त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | जहराबेगम निजामोद्दीन उंटवाले | ७६ | पत्नी |
| २) | इक्रामोद्दीन निजामोद्दीन उंटवाले | ५७ | मुलगा |
| ३) | तसलीम सलीमोद्दीन हाशमी | ५० | मुलगी |
| ४) | नसिमाबेगम युनुस शेख | ४३ | मुलगी |
| ५) | ताईसेन सुलताना मोहम्मद झाकिर हुसेन | ४३ | मुलगी |
| ६) | सलिम निजामोद्दीन उंटवाले | ५० | मुलगा |

अर्जदार सलिम पि. निजामोद्दीन उंटवाले रा. देवणी ता.देवणी जि.लातूर यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.


सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक २०/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २५/०९/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) शिक्का (पी.एम.नाईकवाडे)
क.लिपिक (सहा.अधिक्षक)

उदगीर मनोरंजन
कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो




Caring Since 1980
कै. यशवंतराव बहुउद्देशिय मेडिकल रिसर्च सेंटर द्वारा संचलित
४१ वर्षापेन
यशवंत नेत्र रुग्णालय व फॅको सेंटर
(दृष्टी-एकमेव ध्येय)
डॉ. विश्वास य. सताळकर नेत्ररोग तज्ञ | डॉ. यशोधन वि. सताळकर बाल नेत्ररोग तज्ञ | डॉ. अनुजा य. सताळकर नेत्ररोग तज्ञ
यशवंत नेत्र रूग्णालय व फॅको सेंटर
नंदादीप, नगर परिषदेच्या मागील बाजूस, नई अबादी, उदगीर फोन : 02385-256215

उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर
उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५
वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365
१,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया
मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स
मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार
मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार
कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार
नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार ४ था रविवार
काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार
!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा
डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ
डॉ.अंकिता लाहोटी (DOMS)
डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.)
डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)
डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष
व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर
लॉ. प्रदिप बेद्रे सचिव

DEEPJYOTI EYE HOSPITAL UDGIR
दिपज्योती डोळयांचा दवाखाना
डॉ. ज्योती सोमवंशी
30 वर्षाचा अनुभव
डोळयांचे 60 हजार यशस्वी ऑपरेशन
M.B.B.S., M.S. Ophthalm
Consultant in Catract, Glaucoma, & Pediatric Ophthalmologist
उपलब्ध सुविधा
उदगीर शहरात प्रथमच आत्याधूनीक मशिन (Infinity) व्दारे शस्त्रक्रिया.भुल न देता डोळया वरील मोतीबींदूचे शस्त्रक्रिया. मल्टीफोकल लेन्स यामुळे दुर आणी जवळचे चष्मा न घालता दिसण्याची सोय (Spectacle Free).बीनाटाक्याची मोतीबींदूवर शस्त्रक्रिया.लहान मुलामध्ये मोतीबींदू वर उपचाराची सोय.काच बिंदूचे निदान, उपचार,शस्त्रक्रियाची सोय. डोळयावरील पडदा, नासूर उपचाराची सोय.कॉम्प्युटर व्दारे नेत्र तपासणी.
नाईक चौक,निडेबन रोड, उदगीर जि.लातूर
"WE CARE FOR YOUR EYES"

लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर
नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.



# यशवंत

शुक्रवार दि. ३० ऑगस्ट २०२४



# उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# ग्रंथालयाच्या प्रश्नासंदर्भात ना.चंद्रकांत पाटील यांच्यासोबतची बैठक यशस्वी संपन्न



**उदगीर (प्रतिनिधी)** मुंबई येथे मंत्रालयात ग्रंथालयाच्या प्रश्नासंदर्भात माननीय आमदार अभिमन्यू पवार औसा यांनी आयोजित केलेली बैठक दिनांक २९ ८ २०२४ रोजी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री माननीय चंद्रकांत दादा पाटील साहेब यांच्या समवेतची बैठक सकारात्मक व निर्णायक झाली या बैठकीस माननीय आमदार अभिमन्यू पवार माननीय आमदार सत्यजित तांबे प्रधान सचिव माननीय विकासचंद्र रस्तोगी उपसचिव प्रभाकर लुबाळ माननीय ग्रंथालय संचालक अशोक जी गाडेकर व लातूर जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे कार्यवाह व मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले संघाचे माझे अध्यक्ष ज्येष्ठ संचालक हावगीराव बेरकिळे सदाशिव बेडगे ग्रंथालय संचालनालयातील प्रताप सूर्यवंशी सोनजे हे उपस्थित होते मंत्री महोदयांनी ग्रंथालयाच्या प्रश्नासंदर्भात ४०% अनुदानातून वाडी बाबत बोलताना सांगितले की ४०% अनुदान वाढवून देणे ही क्रमप्राप्त आहे त्याची पूर्ण तयारी झालेली आहे लवकरच मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा विषय मंजूर होईल ग्रंथालयाच्या दर्जा वाढ ही शासनाच्या अटीप्रमाणे व नियमाप्रमाणे जे बसतील ते सर्व ग्रंथालय दर्जा वाढ करण्यात येतील तसेच अ वर्गासाठी २० टक्के अनुदान वाढ देण्यात येईल व नवीन वाचनालयास शासन मान्यता देण्याचे ही आमच्या विचाराधीन आहे दर दहा हजार लोकसंख्येला एक वाचनालय आणि आदिवासी भाग तांडा डोंगरी भाग या गावाला पाचशे लोकसंख्येची आठ ठेवण्यात आलेली आहे राज्यात एकूण १००० नवीन ग्रंथालय मान्यता देण्यात येतील ४० टक्के अनुदान वाढीत ग्रंथालय कर्मचाऱ्यांनाच देण्यात येईल असेही नमूद केले हे सर्व निर्णय सप्टेंबर पर्यंत पूर्ण करण्यात येतील तसे आदेश अधिकाऱ्यांना बैठकी देण्यात आले व मंत्रिमंडळाच्या बैठकीत हे विषय ठेवण्यासाठी नियोजन करण्यास सांगितले आहे शेवटी लातूर जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे यांनी माननीय मंत्री महोदय आमदार अभिमन्यू पवार आमदार सत्यजित तांबे ग्रंथालय संचालक गाडेकर साहेब त्यांचे सर्व कर्मचारी व इतर अधिकाऱ्यांचे मंत्रालयात बैठक बोलवल्यामुळे आणि नियोजन केल्यामुळे मंत्री महोदयाचे व उपस्थित त्यांचे आभार मानले व बैठकीत त्यांना हे प्रश्न सोडवल्याबद्दल धन्यवाद ही दिले.

# उदगीरमध्ये उद्या डॉ.स्मिता लखोटिया यांचा सेवा गौरव सोहळा



**उदगीर (प्रतिनिधी)** महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील इंग्रजी विभागप्रमुख डॉ. स्मिता नागोरी-लखोटिया ३१ ऑगस्ट रोजी सेवानिवृत्त होत आहेत. या निमित्ताने इंग्रजी विभागातील राज्यभरातील माजी विद्यार्थ्यांनी शनिवारी (३१ ऑगस्ट) सेवा गौरव सोहळ्याचे आयोजन केले आहे. महाविद्यालयाच्या ऑडिटोरियममध्ये दुपारी १२.३० वाजता हा सोहळा होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुनअप्पा मानकरी, प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.व्ही. जी.कारखाने उपस्थिती असतील. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. रेखा रमन रेड्डी, संस्थेचे सचिव रामचंद्र तिरूके, सहसचिव डॉ.रामप्रसाद लखोटिया, ॲड. एस.टी. पाटील, संस्थेचे सदस्य बस्वराज पाटील नागराळकर, मनोहर पटवारी आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन माजी विद्यार्थ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# तालुकास्तरीय मुलींच्या कबड्डी स्पर्धेत सुल्लाळी- डोंगरगावचा संघ प्रथम



**जळकोट (प्रतिनिधी)** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूर व तालुका क्रीडा परिषदेच्या वतीने दि.२८ऑगस्ट रोजी श्री गोविंद स्मारक विद्यालय वांजरवाडा ता.जळकोट शाळेच्या मैदानावर आयोजित तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत १७ वर्ष मुलींच्या वयोगटात माध्यमिक आश्रमशाळा सु-डोंगरगांव ता.जळकोट संघ प्रथम आला.

माध्यमिक आश्रमशाळा चिंचोली व माध्यमिक आश्रमशाळा सु-डोंगरगांव या दोन संघा दरम्यान हा अंतिम सामना झाला. या अंतिम सामन्यात माध्यमिक आश्रमशाळा सु- डोंगरगांव संघाने ३३ गुणांने विजय मिळवला. विजयी संघात रूकसार भांडे(कर्णधार) निशाद चंदा,आयेशा शेख,रूबिना चंदा,प्रतिक्षा वाघमारे,निकिता वाघमारे,अश्विनी डांगे,प्रगती वाघमारे.राजश्री डांगे,राणी कांबळे,आरती करडे,अंजूम जमादार यांचा समावेश होता. तालुकास्तरीय मुलींच्या कबड्डी स्पर्धेत माध्यमिक आश्रमशाळा सु-डोंगरगांवचा संघ प्रथम ठरला.

या यशाबद्दल विमुक्त जाती सेवा समिती वसंतनगर ता.मुखेड संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती चक्रावती राठोड,सचिव गंगाधरजी राठोड, विमुक्त जाती सेवा समितीचे सदस्य मारोती चव्हाण,माध्यमिकचे मुख्याध्यापक संतोष जामकर,प्राथमिकचे मुख्याध्यापक अनिल कौठेंकर,क्रीडा शिक्षक जयप्रकाश इंगोले, संघाचे प्रशिक्षक कमाल पठाण,शादूल मुल्ला,आश्विनी काकडे मॅडम,संघ व्यस्थापक व मार्गदर्शक हरीश पाटील, अतुल चव्हाण, गुरूनाथ पवार, नंदकुमार मदनवाड, आत्माराम संत्रे, शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांने विजयी संघाचे अभिनंदन केले आहे.

# भाऊसाहेब सहकारी बँकेची २९ वी सर्वसाधारण सभा संपन्न




**उदगीर (प्रतिनिधी)** येथील भाऊसाहेब सहकारी बँक लि.उदगीरची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २५ ऑगस्ट रोजी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

येथील विशाल मंगल कार्यालयात बँकेचे अध्यक्ष भगवानराव रामचंद्रराव पाटील तळेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पार पडली. यावेळी मंचावर खरेदी-विक्री संघाचे चेअरमन भरत चामले, उदगीर जनता मल्टिस्टेट को-ऑपचे संचालक चंद्रकांत वैजापूरे, देवणी बाजार समितीचे सभापती सदाशिव पाटील तळेगावकर, उदगीर, बाजार समितीचे माजी उपसभापती रामराव बिरादार, बँकेचे उपाध्यक्ष वसंतराव सोनकांबळे, संचालक किशनराव हरमुंजे, मनोज पुदाले, तानाजी पाटील तळेगावकर, ईश्वर खटके, रविंद्र हसरगुंडे, विजयकुमार पारसेवार, दिनेश पाटील, कोमल बिरादार, उत्तरा कलबुर्गे, गोपीनाथ सगर सह शंकरराव पाटील तळेगावकर, बाबासाहेब काळे पाटील, अँड. दत्ताजी पाटील, विनायकराव बेंबडे, विजयकुमार पाटील बामणीकर, अशोकराव पाटील बटनपूरकर, शांतीनाथ ढगे, मनोज चिखले आदी उपस्थित होते. प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने सभेची सुरुवात करण्यात आली. या सर्वसाधारण सभेचे प्रास्ताविक डॉ. लक्ष्मीकांत कुलकर्णी यांनी केले तर विषयांचे वाचन बँकेचे प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी पाटील यांनी केले. या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये बँकेच्या सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा व उत्कृष्ट खातेदारांचा तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना बँकेचे अध्यक्ष भगवानराव पाटील यांनी, सर्वांच्या सहकार्याने बँकेने आपल्या २९ वर्षांच्या यशस्वी कालखंडात अनेक संकटांवर मात करत आठ शाखांसह ग्राहकांना विविध डिजिटल सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचे सांगितले. आर्थिक विकासासोबतच बँकेने सामाजिक ऋण जोपासण्याचाही प्रयत्न सातत्याने करीत असल्याचे नमूद करून सभासदांना ७ टक्के इतके लाभांश जाहीर केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्राचार्य धनाजी राजे यांनी केले. यावेळी बँकेचे सभासद, हितचिंतक, ठेवीदार, खातेदार व बँकेचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उदगीर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने मुक आंदोलन करून दोषीवर कडक कार्यवाही करण्याची मागणी



**उदगीर (प्रतिनिधी)** मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा कोसळल्याची घटना घडली. ही घटना अत्यंत वेदनादायी आहे. सदर घटनेचा निषेध राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी उदगीर शहरच्या वतीने दि. २९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर मुक आंदोलन करुन उपजिल्हाधिकारी यांच्या माफर्फत मुख्यमंत्र्याकडे दोषींवर कडक कारवाई करावे अशा आशयाचे निवेदन देवुन करण्यात आले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे, क्रीडा मंत्री संजय बनसोडे , जिल्हाध्यक्ष अफ्फसर शेख यांच्या आदेशानुसार मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा कोसळल्याची घटना घडली सदर घटना ही अत्यंत वेदनादायी आहे. सदर घटनेचा निषेध राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी उदगीर शहरच्या उदगीर येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या समोर मुक आंदोलन करुन निवेदन देण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ महेम्मद हनीफ्फ, शहर कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, माजी नगरसेवक शेख फ्फैय्याज , व्यंकट बोईनवाड, राजकुमार चव्हाण, इम्तियाज शेख, प्रदीप जोंधळे,शफ्फी हाशमी, अभिजित औटे, दिपाली औटे, उर्मिला वाघमारे, गिरीश उप्परबावडे ,वैशाली कांबळे, काजल मिरजगावे, आजम पटेल,सुनिता तेलंगे,किशाबाई कांबळे,जुलेखा बी शेख, अझहर मोमीन, संघशक्ती बलांडे,फ्फेरोज पठाण, राजकुमार गंडारे, सतिश कांबळे, बापू साळुंके, अमजद शेख, रतिकांत घोगरे,गौतम कांबळे,रऊफ्फ थोडगे, बबलू शेल्हाळकर, अनिल कुसाळे, सय्यद सलीम, अखिल मोमीन,राम सोनवणे,विष्णू वागलगावे ,शेख शहेबाज, अभिषेक बरुरे, हाशमी हिफ्जु रहेमान,विश्वा पाटील,शुभम केंद्रे, अरुण उजेडकर आदीसह राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.